शुक्रवार, २३ डिसेंबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १५५
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## मास्कसह कोरोनाचे सर्व नियम पाळा -पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली :** मास्कसह कोरोनाच्या सर्व नियमांचे पालन करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना केले आहे. त्याचप्रमाणे येणारे सण आणि न्यू इयर सेलिब्रेशनसाठी राज्यांनी सतर्क राहण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. चीन व अन्य काही देशांमध्ये वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि. २२) पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली महत्त्वाची बैठक झाली. या वेळी देशातील कोरोना परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. सर्व राज्यांच्या आरोग्य यंत्रणा अलर्टवर ठेवण्याच्या सूचना पंतप्रधानांनी या बैठकीत दिल्या. लसीकरणासह सतर्क राहणे महत्त्वाचे असल्याचे सांगत पंतप्रधानांनी देशवासीयांना सुरक्षेच्या सर्व नियमांचे पालन करावे, असे आवाहन केले तसेच कोरोना नियमांसंदर्भात जनतेत पुन्हा जागरूकता आणावी, अशा सूचना त्यांनी राज्यांना केली.

अंतरंग
मिनीडोअर चालक, मालक संघटनेचे उपोषण स्थगित/२
सिडको गृहनिर्माण योजनेत अर्ज करण्यासाठी मुदतवाढ/३
दुसऱ्या कसोटीत बांगलादेशचा पहिला डाव गडगडला/८

### आमदार प्रशांत ठाकूर यांची हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी मागणी

# रायगडातील सर्व विद्यार्थ्यांना सुविधांचा लाभ मिळावा

**नागपूर : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक तसेच अन्य विविध योजनांचा लाभ आधार कार्ड असलेल्या विद्यार्थ्यांना मिळत असतो. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना सुविधांचा लाभ मिळण्यासाठी आधार कार्डसंदर्भातील त्रुटी दूर कराव्यात, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात केली. त्यावर एकही विद्यार्थी सुविधांपासून वंचित राहणार नाही यासाठी योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना आश्वासित केले.




महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या बाबीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या सभागृहात लक्षवेधी सूचना मांडली. त्यांनी आपल्या लक्षवेधी सूचनेत म्हटले की, राज्य शासनाने संच मान्यतेसाठी पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची माहिती सरल प्रणालीवर भरणे शाळांना बंधनकारक केले असून आधार कार्डवरील तपशिलात त्रुटी असल्याने रायगड जिल्ह्यातील जवळपास ४९ हजार ४८४ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. आधार कार्डची नोंदणी बंधनकारक असल्यामुळे विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे व आधार कार्डवरील चुकांची दुरूस्ती करण्याचे काम शिक्षक व मुख्याध्यापकांनी करणे आवश्यक असल्याने या कामामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण देताना शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक तसेच विविध योजनांचा लाभ आधार कार्ड असलेल्या विद्यार्थ्यांना मिळत असतो. त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये शासनाच्या या निर्णयामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून आवश्यक कार्यवाही व उपाययोजना करावी, अशी मागणी या लक्षवेधी सूचनेतून केली.

### एकही विद्यार्थी सुविधांपासून वंचित राहणार नाही -शिक्षणमंत्री



पुढे बोलताना आधार कार्डसंदर्भात शासनाने डिसेंबर २०२२पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्देश केले आहे. जर डिसेंबर २०२२पर्यंत हे काम पूर्ण झाले नाही तर आधार कार्ड नसलेल्या किंवा लिंक न झालेल्या अशा विद्यार्थ्यांचे आयडेंटीफाईड करून त्यांना आधार कार्ड मिळण्यासाठी शासन विशेष मोहीम राबविणार आहे का? सवाल करतानाच सरल योजनेचे नोंदले न गेलेल्या विद्यार्थ्यांना आज लागू असलेल्या सगळ्या योजनांचा लाभ मिळेल याची शासनाने हमी घेण्यासंदर्भातही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या लक्षवेधीतून मागणी केली. **(पान २ वर..)**

# दिशा सालियन प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**नागपूर : प्रतिनिधी**

बॉलीवूड अभिनेता दिवंगत सुशांतसिंह राजपूत याची मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यूप्रकरणी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. दिशा सालियनचे प्रकरण मुंबई पोलिसांकडे आहे. या प्रकरणाचे ज्यांच्याकडे पुरावे असतील त्यांनी ते द्यावे. या प्रकरणाची एसआयटीच्या माध्यमातून चौकशी केली जाईल, असे फडणवीस यांनी गुरुवारी (दि. २२) विधानसभेत जाहीर केले.

अभिनेता सुशांतसिंह राजपूत मृत्यू प्रकरणावरून शिंदे गटाचे खासदार राहुल शेवाळे यांनी शिवसेना आमदार आदित्य ठाकरेंवर गंभीर आरोप केले होते. सुशांतसिंह राजपूतच्या मृत्यूआधी रियाला 'एयू'संपर्क क्रमांकावरून ४४ फोन कॉल आले. 'एयू'चा अर्थ आदित्य उद्धव ठाकरे असा असल्याचे सांगत शेवाळेंनी लोकसभेत मुद्दा उपस्थित करून चौकशीची मागणी केली होती.

खासदार राहुल शेवाळे यांनी सुशांतसिंह राजपूत प्रकरण लोकसभेत उपस्थित केल्यानंतर शिंदे गट आणि भाजपने दिशा सालियन प्रकरणावरून विधानसभा आणि विधान परिषदेत आदित्य ठाकरेंना घेरले.



या प्रकरणावरून विविध प्रश्न उपस्थित करीत चौकशीची मागणी आमदार भरत गोगावले आणि नितेश राणे यांनी केली.


या संदर्भात बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दिशा सालियन प्रकरणाची चौकशी कधीच सीबीआयकडे नव्हती. सुशांतसिंह राजपूत प्रकरणाची चौकशी सीबीआय करीत आहे. दिशा सालियन प्रकरणात सीबीआयला विचारण्यात आले तेव्हा त्यांनी हे प्रकरण आमच्याकडे नाही, असे सांगितले. त्या संदर्भात सीबीआयचा कोणताही क्लोजर रिपोर्ट नाही आहे. याबाबत जे काही पुरावे मांडले जात आहेत त्याच्या आधारावर कोणताही राजकीय आकस न ठेवता निपक्षपणे चौकशी करण्यात येईल.



**पनवेल : तालुक्यातील न्हावेखाडी येथील श्री म्हसेश्वर मंदिर परिसरात साकारण्यात आलेल्या रामबाग या उद्यानाचे लोकार्पण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत अमोघ प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. या सोहळ्यास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांसह ठाकूर कुटुंबीय, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.**
(छाया : हरेश साठे) **वृत्त उद्याच्या अंकात**

## अपशब्द वापरल्याप्रकरणी जयंत पाटील यांचे निलंबन

**नागपूर** : येथील हिवाळी अधिवेशनात अपशब्द वापरल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे. या वेळी विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली.



हिवाळी अधिवेशनामध्ये गुरुवारी (दि. २२) दिशा सालियान प्रकरणावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. या वेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शांततेचे आवाहन केले. दुसरीकडे विरोधकांचा गोंधळ सुरूच होता. या वेळी बोलू दिले नाही म्हणून राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी, अध्यक्ष महोदय तुम्ही असा निर्लज्जपणा करू नका, असे शब्द वापरले. त्यामुळे अधिवेशन संपेपर्यंत पाटील यांनी निलंबित करण्यात आले आहे.

## निवडक

### ताजमहाल पाहण्यासाठी कोरोना टेस्ट बंधनकारक

**आग्रा** : वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ताजमहालसंदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. कोरोना चाचणी केल्याशिवाय पर्यटकांना ताजमहाल परिसरात प्रवेश मिळणार नाही. ताजमहाल पाहायला रोज देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येतात. या सर्व पर्यटकांना कोरोना टेस्ट बंधनकारक करण्यात आली असून टेस्टनंतरच ताजमहाल पाहता येणार आहे.

### २०पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद होणार नाहीत

**मुंबई** : राज्यातील २० आणि त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद होणार असल्याचा चर्चा सुरू असताना शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी त्यास पूर्णविराम दिला आहे. विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देताना त्यांनी या शाळा बंद होणार नसल्याचे स्पष्ट केले.

## कोविडबाबत राज्य सरकार सतर्क

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्र्यांनी घेतला परिस्थितीचा आढावा



**नागपूर : प्रतिनिधी**

कोरोना पुन्हा डोके वर काढू लागल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि. २) नागपूर येथे बैठक झाली. या बैठकीत चाचण्या, ट्रॅकींग, उपचार, लसीकरण आणि कोविड अनुरूप वर्तन अशी पंचसुत्री राबविण्याचे निर्देश देण्यात आले. या संदर्भात आरोग्यमंत्र्यांनी विधिमंडळ अधिवेशनातही निवेदन देत सतर्कतेचे आवाहन केले आहे.

चीन, जपानसह जगातील अनेक देशांमध्ये कोरोनाने पुन्हा एकदा हाहाकार माजवायला सुरुवात केली. भारतातही बीएफ ७ व्हेरिएंटची लागण झालेले रुग्ण आढळले आहेत. यानंतर भारत सरकार सतर्क झाले आहे. गर्दीच्या ठिकाणी लोकांनी मास्क घालावेत, सोशल डिस्टन्सिंग नियम पाळण्याच्या सूचना राज्य सरकारांना दिल्या आहेत, अशी माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडवीय यांनी लोकसभेत दिली. या निर्देशानंतर महाराष्ट्र सरकारने सायंकाळी तातडीची बैठक बोलावली होती.

दरम्यान, ख्रिसमस आणि नवीन वर्षातील सलग सुट्ट्यांचे निमित्त साधून भाविक महाराष्ट्रातील प्रमुख मंदिरांमध्ये गर्दी करण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या मंदिर प्रशासनांनी मास्कसंदर्भात निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे.

## आज पनवेलमध्ये जयपूर फूट बसविण्याचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २३) जयपूर फूट बसविण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.



पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सकाळी ९ वाजता हा उपक्रम होणार आहे.

मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूटसंदर्भात ऑक्टोबर महिन्यात शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात हात, पाय नसलेल्या दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून कृत्रिम हात, पायासाठी मापे घेण्यात आली होती. त्या १०२ व्यक्तींना हे कृत्रिम अवयव बसविण्यात येणार आहेत.

## पुण्यातील भाजप आमदार मुक्ता टिळक यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**



पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघाच्या भाजप आमदार मुक्ता टिळक यांचे गुरुवारी (दि. २२) निधन झाले. त्या ५९ वर्षांच्या होत्या. कर्करोगामुळे गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते.

पुण्यात २०१७च्या महापालिका निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले होते. पुणे महापालिकेच्या इतिहासात भाजपची प्रथमच सत्ता आल्यानंतर या पक्षाच्या पहिल्या महापौर होण्याचा मान चार वेळच्या नगरसेविका मुक्ता टिळक यांना मिळाला. अडीच वर्षे त्या महापौर होत्या. नगरसेवक असतानाच त्यांनी २०१९मध्ये विधानसभा निवडणूक लढविली. या निवडणुकीतही त्या विजयी झाल्या होत्या.

दरम्यान, असाध्य कर्करोगाने ग्रस्त असतानाही मुक्ता टिळक यांनी राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीत रुग्णवाहिकेतून मुंबईत जाऊन मतदान केले होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पक्षाच्या अन्य वरिष्ठ नेत्यांनी त्यांच्या या पक्षनिष्ठेचे कौतुक केले होते. टिळक यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त होत आहे.

# पनवेल वकील संघटनेच्या निवडणुकीत अ‍ॅड. मनोज भुजबळ यांची विजयी हॅट्ट्रिक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल बार असोसिएशन या वकील संघटनेच्या त्रैवार्षिक निवडणुकीत अ‍ॅड. मनोज भुजबळ यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलचा दणदणीत विजय झाला आहे. अ‍ॅड. भुजबळ यांच्यासह अकरापैकी नऊ सदस्य निवडून, तर एक सदस्य बिनविरोध निवडून आला आहे.

या निवडणुकीत ९९७ मतदारांपैकी ९०८ वकील मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

### पॅनलचेही दणदणीत यश



या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अ‍ॅड. भुजबळ व सहकाऱ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. **(पान २ वर..)**

**पनवेल कोर्टाच्या जुन्या इमारतीच्या पुनर्वसनासाठी पुढाकार घेऊन कोरोना काळात प्रलंबित राहिलेल्या कामांना गती देणार आहे. वकिलांच्या आणि विशेषतः नवोदित वकिलांच्या मार्गदर्शनासाठी शिबिर तसेच कार्यशाळांचे आयोजन करून प्रशिक्षणासाठी अधिक लक्ष घालून वकिलांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करेन.**

**-अ‍ॅड. मनोज भुजबळ,**
**अध्यक्ष, पनवेल बार असोसिएशन**

### हा तरुणाईचा विजय -अ‍ॅड. भुजबळ

प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या वकील संघटनेच्या निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल बोलताना अ‍ॅड. मनोज भुजबळ यांनी आपल्या सहकाऱ्यांना व विशेषकरून नवोदित वकील आणि नवीन सदस्यांनाही धन्यवाद दिले. हा माझा एकट्याचा विजय नसून संपूर्ण टीम आणि आमच्यावर तिसऱ्यांदा विश्वास ठेवणाऱ्या ज्येष्ठ आणि युवा वकील सहकाऱ्यांचा आहे, असे ते म्हणाले.

***विजयी उमेदवार :*** *मनोज भुजबळ (अध्यक्ष), संदीप रमाकांत जगे (उपाध्यक्ष), प्रल्हाद घनश्याम खोपकर (सचिव), सीमा मंगेश भोईर (सहसचिव), धनराज कान्हा तोकडे (खजिनदार), प्रगती जनार्दन माळी, अमित बाळाराम पाटील, भूषण मोरेश्वर म्हात्रे (कार्यकारिणी सदस्य).*



# आदित्य ठाकरेंची नार्को टेस्ट करा

## दिशा सालियन प्रकरणावरून आमदार नितेश राणे यांची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

दिशा सालियन प्रकरणावरून भाजपचे नेते नितेश राणे यांनी आदित्य ठाकरे यांची नार्को टेस्ट करा, अशी मागणी केली आहे.

प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना आमदार नितेश राणे म्हणाले, आदित्य ठाकरेंची नार्को टेस्ट करा आणि सुशातसिंग राजपूत व दिशा सालियान यांच्याबाबतचे सत्य लोकांना समजू द्या. दिशा सालियानची केस आजही मुंबई पोलिसांकडे आहे, सीबीआयकडे नाही. सीबीआय केवळ सुशांतसिंग राजपूतच्याच केसचा तपास करीत आहे. मी मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगेन की, दिशा सालियानची केस मुंबई पोलिसांकडे आहे, ती कृपा करून आपण पुन्हा सुरू करा, त्याची परत चौकशी करा.

याचबरोबर सगळेच लोक एका माणसाचे नाव का घेत आहेत? महाराष्ट्रात दुसरे नेते नाहीत? एकाच माणसाचे नाव घेत आहेत, म्हणजे काही काहीतरी असेल. ३२ वर्षांच्या आमच्या कोवळ्या मित्राने एसआयटीसमोर जाऊन बसावे आणि सत्य ते सांगावे, असेही नितेश राणे यांनी सांगितले.

याशिवाय, हुकुमशाही होती म्हणून तर दिशाला तेव्हा न्याय मिळाला नाही. आता लोकशाही आहे, आता आमच्या माता-भगिनींना न्याय मिळेल. हे एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे सरकार करेल, असेही या वेळी नितेश राणे म्हणाले.

दिशा प्रकरणावरुन शिंदे गट आणि भारतीय जनता पक्षाने शिवसेनेचे नेते आणि माजी मंत्री आदित्य ठाकरेंना घेरण्याचा प्रयत्न केला. दिशा सालियन प्रकरणावरून विविध प्रश्न उपस्थित करीत चौकशीची मागणी शिंदे गट आणि भाजाने केली होती. या प्रकरणावरून झालेल्या गोंधळामुळे पाच वेळा विधानसभा तहकूबही करण्यात आली. त्यानंतर उपमुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिशा सालियन प्रकरणामध्ये एसआयटीच्या माध्यमातून चौकशी केली जाईल अशी घोषणा केली.

# मिनीडोअर चालक, मालक संघटनेचे साखळी उपोषण स्थगित

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मिनीडोअर चालक, मालक संघटनेने आपल्या मागण्यांसाठी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेले साखळी उपोषण स्थगित केले.

मिनीडोअर चालकांच्या मागण्यांसंदर्भात पालकमंत्री उदय सामंत, आमदार महेंद्र दळवी, आमदार भरत गोगावले यांनी केलेल्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह इतर अधिकारी, मिनीडोअर चालक, मालक संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय पाटील व इतर पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान परिवहन आयुक्त व परिवहन सचिव यांच्याशीदेखील दूरध्वनीवरून चर्चा करण्यात आली. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्यानंतर योग्य प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. सहाआसनी रिक्षांची वयोमर्यादा वाढवून



द्यावी तसेच स्क्रॅबमध्ये जाणाऱ्या सहाआसनी तीनचाकी रिक्षांच्या जागी चारचाकी सीएनजी गाड्यांना परवानगी द्यावी, अशी संघटनेची प्रमुख मागणी आहे. मागील महिन्यात संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले होते. त्यावेळी आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करण्यात आली होती.



**डोंबिवली : अखिल आगरी समाज परिषदेचे मुखपत्र असलेल्या आगरी दर्पण मासिकाच्या आगरी दर्पण दिनदर्शिका २०२३चे प्रकाशन डोंबिवली येथे आयोजित आगरी महोत्सवात करण्यात आले. या दिनदर्शिकेत पंचांग, नेत्यांच्या जयंती, पुण्यतिथी, मराठी सण, उत्सव, जासई शेतकरी स्मृतीदिन, संकष्ट चतुर्थी, मराठी महिने अशी विविध माहिती देण्यात आली आहे.**

# शेलूजवळ आढळला मृतदेह

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील कर्जत-कल्याण राज्यमार्गावरील शेलू गावाच्या हद्दीत झाडीमध्ये एका पुरुषाचा मृतदेह आढळला आहे. शेलू गावातील देवीच्या मंदिर परिसरात भरणाऱ्या यात्रेसाठी साफसफाई करताना हा मृतदेह स्थानिकांना आढळून आला. त्यामुळे नेरळ परिसरात घबराट पसरली आहे.

नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या शेलू गावात पौष महिन्यात देवीची यात्रा भरते. या यात्रेसाठी दुकाने, खेळण्याचे साहित्य उभे करण्यासाठी परिसरात साफसफाई केली जात आहे. ही कामे सुरू असताना बुधवारी (दि. २१) रस्त्याच्या कडेला असलेल्या दाट झाडीमध्ये दुर्गंधी येत असल्याने तेथे पाहण्यास गेले असता मृतदेह आढळून आला.

त्याची माहिती मिळताच कर्जतचे पोलीस उपअधीक्षक विजय लगारे आणि नेरळचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर घटनास्थळी पोहचले. हा मृतदेह किमान आठवडाभरापुर्वी टाकण्यात आला असावा, असा पोलिसांचा अंदाज आहे. तो मृतदेह कुजलेल्या स्थितीत असल्याने पोलिसांनादेखील त्याबाबत अंदाज येणे कठीण होऊन बसले आहे. घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाची चक्रे तातडीने फिरविली.

# रंगोत्सव स्पर्धेत पालिकेचे विद्यार्थी चमकले

**नवी मुंबई : बातमीदार**

रंगोत्सव सेलिब्रेशन ऑर्गनायझेशन या संस्थेच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धांमध्ये चित्र रंगविणे, हस्ताक्षर, कोलाज, ग्रीटिंग बनविणे, स्केचिंग करणे, कार्टून बनविणे, टॅटू बनविणे, बोटांचे ठसे व त्यातून चित्रनिर्मिती आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत २८ राज्यांतून एकूण २००० शाळांनी आपला सहभाग नोंदविला. स्पर्धेत नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १० नेरुळ गाव शाळेतील एकूण सात विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. तीन विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, चार रजत पदक मिळविले व त्यांची आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धेमध्ये निवड झाली.

यामध्ये प्रियंका शशी बाबर इ. पाचवी कोलाज स्पर्धा सुवर्णपदक, ईश्वरी अमित चांगण इ. तिसरी हस्ताक्षर स्पर्धा सुवर्णपदक व ग्रीटिंग बनविणे रजतपदक, आनंदी अर्जुन सहानी इ. सहावी कोलाज स्पर्धा सुवर्णपदक, भाविका मनोहर पयेर इ. पाचवी चित्र रंगविणे रजतपदक, वैष्णवी मंगेश पडवळ इ. चौथी कार्टून चित्र बनविणे रजतपदक, खुशी रामेश्वर चव्हाण इ. चौथी हस्ताक्षर स्पर्धा रजतपदक पटकाविले.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे आयोजन व विद्यार्थ्यांची तयारी आपल्या शाळेतील कला शिक्षिका भावना खिस्ते यांनी केली, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका मेघा आचरेकर यांनी यशस्वी विद्यार्थी आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुंबई ते आळंदी वारीचे नेरूळमध्ये स्वागत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गजानन भक्त एस. एस. बाळापुरे चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने भव्य आळंदी वारीचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई ते आळंदी अशा वारीमार्गात नवी मुंबई नेरूळ येथील श्री स्वामी समर्थ मठात पालकीचे धार्मिक श्रद्धेने स्वागत करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ वारकऱ्यांचा सत्कार करण्यात आला.एस. एस. बाळापुरे चॅरिटेबल ट्रस्ट श्री गजानन महाराज (शेगाव) मठ गोरेगाव मुंबई येथून गजानन महाराज पालखीचे प्रस्थान झाले. मुंबईतील अंधेरी त्यानंतर ठाणे, ऐरोलीमार्गे पालखी तळेगाव, सुमटणे, चिंचवडगाव, खडकी त्यानंतर आळंदी येथे दाखल झाल्यानंतर मिरवणूक काढून पुन्हा पालखी परतीच्या मार्गे निघाली. येताना नेरूळ सेक्टर ११ येथील स्वामी समर्थ श्री गजानन महाराज मठात पालकीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर नेरुळ क्षेत्र १वरून क्षेत्र २ आणि ३मार्गे मिरवणूक काढण्यात आली.

त्यानंतर नेरुळ सेक्टर १८ येथील जलकिरणस्थळी दत्तात्रय वाव्हळ यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ वारकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. महाराजांच्या पादुका पूजन झाले व महाप्रसादाचा आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर पालखी गोरेगाव येथील महाराजांच्या मठात विराजमान झाली.



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fees:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000025362** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-53/2022-2023 RFx Re-E-Tender for Providing and fixing of rain guard for Buchholz Relay and PRVs at various substations under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 3,03,723/- **EMD:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 23.12.2022, 11:00 Hrs to 01.01.2023, 23:59 Hrs |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 01.01.2023 up to 23:59 Hrs |
| 4 | Online Opening of the Techno Commercial RFx | 02.01.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fees:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000025353** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-52/2022-2023 RFx Re-E-Tender for Providing and installation of LED Panel Light for false ceiling at 100 kV Taloja substation and Panvel Division Office under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 2,57,468/- **EMD:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 23.12.2022, 18:00 Hrs to 01.01.2023, 23:59 Hrs |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 01.01.2023 up to 23:59 Hrs |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 02.01.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022- 2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

**पान १ वरून**

## रायगडातील सर्व विद्यार्थ्यांना सुविधांचा लाभ मिळावा

राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी या वेळी सांगितले की, सरल प्रणालीमध्ये प्रत्येक विद्यार्थी नावासहित नोंदविलेला असतो. त्या प्रत्येक विद्यार्थ्याला सुविधा देत असतो. आधार कार्ड लिंकिंग अनिवार्य असल्याने तशी यंत्रणा कार्यान्वित असून ३१ डिसेंबर २०२२पर्यंत रायगड जिल्ह्याचे काम पूर्ण करण्यात येईल. आधार कार्डसंदर्भात केंद्र सरकारची यंत्रणा असलेल्या आयटीआय हे काम करीत असून प्रत्येक तालुक्याला दोन मशिन्स देण्यात आल्या आहेत तसेच त्यांना अतिरिक्त जी काही मदत लागेल ती देण्याच्या अनुषंगाने कार्यालयांना सूचना देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात पाच लाख १४ हजार १२९ विद्यार्थी आहेत. त्यापैकी पाच लाख तीन हजार ८६३ आधार कार्ड लिंक झाली आहेत. उर्वरित १० हजार २६६ विद्यार्थ्यांच्या आधार कार्डसंदर्भातील प्रक्रिया पूर्ण केली जाईल तसेच आधार कार्ड लिंक करण्यास काही अडचण असल्यास त्यांना अधिकचा वेळ द्यावा लागला तर दिला जाईल आणि एकही विद्यार्थी सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सभागृहात आश्वासित केले.

## पनवेल वकील संघटनेच्या निवडणुकीत ॲड. मनोज भुजबळ यांची विजयी हॅट्ट्रिक

पनवेल येथील न्यायालयाच्या नवीन इमारतीत झालेल्या निवडणुकीसाठी मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ एच. जे. शेळके, तर सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. शशिकांत म्हात्रे, ॲड. राजेश खंडागळे तसेच ॲड. राजेश पाटील, ॲड. विकी दूसिंग, ॲड. संदीप मुंडकर, ॲड. जगदीश ठाकूर, ॲड. दक्षता पुनकर, ॲड. त्रिवेणी भगत, ॲड. सोमनाथ पाटील, ॲड. कल्पेश कांबळे या विधी तज्ज्ञांनी कामगिरी बजावली.

**कागदपत्र हरविलेबाबत**

रोहित धिरेंद्र पोखारीया पत्ता :- रूम नं ६०२ विशाल जून्नर को. हौ. सोसायटी से. २० खारघर नवी मुंबई यांचेकडून प्रवास करीत असताना खालील कागदपत्र- दिनांक २२/१२/२०२२ रोजी दुपारी १६.०० वाजता खारघर परिसरात कोठेतरी पडून हरवले आहे. त्याबाबत खारघर पोलीस स्टेशनला दिनांक २२/१२/२०२२ रोजी नोंद केली आहे. मिसींग रजिस्ट्रेशन नं. २८७४/२०२२, दि. २२/१२/२०२२

**हरविलेले कागदपत्र-**

**लिव्हिंग सर्टिफिकेट नं- S/६३४**

सदर कागदपत्र जर कुणाला सापडले असल्यास रोहित धिरेंद्र पोखारिया यांचेकडे आणून द्यावे अथवा खालील फोन नंबरवर संपर्क साधावा.

**सही/-**
**रोहित धिरेंद्र पोखारिया**
**मो. ९१६७३६६६९२/९९८७०१८१४०**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - रानवड, तालुका-उरण, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे. आर..पॉ. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १२०/३ | ०-१८-७० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-२०-७० | ४.६९ | श्री. बाबुराव रामवरन वर्मा |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि. २२/१२/२०२२.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो. क्र. : ९९३०३६९८६१

**सिडको** शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषांगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या वरचे ओवळे येथील गावठाणाच्या जमिनीवरील बांधकाम क्र. KP-१३४,८१A,८१B हे **नारायण नागू धुमाळ, मच्छिंद्रनाथ नारायण धुमाळ, विक्रम घनश्याम धुमाळ** यांच्याकडुन संपादित झालेले आहे. सदर बांधकाम धारकांना भूखंड क्र. ७९, सेक्टर R४, क्षेत्र ५८० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

| गावाचे नाव/ संचिका क्र. | निवाडा क्र. | बांधकाम क्र. | बांधकामधारकाचे नाव | बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.) | वाटपित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| कोपर | KOP-ICIG-२८ | KP- १३४, ८१A,८१B | १) श्री. मच्छिंद्रनाथ नारायण धुमाळ<br>२) श्री. विक्रम घनश्याम धुमाळ<br>**३) नारायण नागू धुमाळ (मयत)**<br>श्रीमती खारूबाई नारायण धुमाळ<br>श्री. मच्छिंद्रनाथ नारायण धुमाळ<br>श्री. अरुण नारायण धुमाळ<br>श्री. निलेश नारायण धुमाळ<br>श्री. जगदीश नारायण धुमाळ<br>श्री. धनराज नारायण धुमाळ<br>सौ. स्मिता दिलीप म्हात्रे | १९२.२० | पुष्पक | R४ | ७९ | ५८० |

**नारायण नागू धुमाळ** यांचे वारस श्रीमती खारूबाई नारायण धुमाळ, श्री. मच्छिंद्रनाथ नारायण धुमाळ, श्री. अरुण नारायण धुमाळ, श्री. निलेश नारायण धुमाळ, श्री. जगदीश नारायण धुमाळ, श्री. धनराज नारायण धुमाळ, सौ. स्मिता दिलीप म्हात्रे यांना इरादित भूखंड क्र. ७९, सेक्टर-R४, क्षेत्र ५८० चौ. मी. या भूखंडाचे हक्कसोड पत्र अनुक्रमे पवल ५-१५६७८-२०२२, दि. २८.०९.२०२२, सह दुय्यम निबंधक - ५, पनवेल यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| अ.क्र. | नावे |
|---|---|
| १) | श्री. मच्छिंद्रनाथ नारायण धुमाळ |
| २) | श्री. विक्रम घनश्याम धुमाळ |
| ३) | **श्री. जगदीश नारायण धुमाळ** |

उपरोक्त हक्कसोड पत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तींच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांत कोण्त्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील वाटपित केलेल्या भूखंडासंदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार यापुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ), तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांच्या कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/३८१/२०२२-२३**

## पनवेल मनपाचे स्वच्छतेसाठी आणखी एक पाऊल!

# शुन्य कचरा, आत्मनिर्भर वॉर्ड कार्यक्रम





**पथनाट्यातून जनजागृती**

**पनवेल बसस्थानक, रेल्वेस्टेशन, आरटीओ कळंबोली, वडाळा लेक येथे महापालिकेमार्फत नागरिकांमध्ये ओला व सुका कचरा वर्गीकरण जनजागृती तसेच पथनाट्य सादर करण्यात आले.**

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका स्वच्छ भारत अभियानांर्गत गुरुवारी (दि. २२) जनजागृती करण्याच्या दृष्टीने ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून खतनिर्मिती करण्याबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रभाग समिती 'अ' खारघर विभागातील सेक्टर १४ येथील रघूनाथ विहार सोसायटी, सेक्टर १४ खारघर येथे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरमधील विद्यार्थ्यांना या वेळी प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून प्रात्यक्षिक करून घेण्यात आले

पनवेल महानगरपालिका स्वच्छ भारत अभियानांर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबवित आहे.

गुरुवारी प्रभाग समिती 'अ' खारघर विभागातील सेक्टर १४ येथील रघूनाथ विहार सोसायटी, सेक्टर १४ खारघर येथे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर मधील विद्यार्थ्यांना ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून खतनिर्मिती करण्याबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून प्रात्यक्षिक करून घेण्यात आले.

या वेळी रघुनाथ विहार सोसायटीमधील डॉ. दिवाकर रेड्डी, चंद्रमोहन नायर, निर्मला नायर, मृणाली निगडे, मॅटू व शाळेमधील शिक्षक तसेच स्वच्छता निरीक्षक अतुल मोहोकर, संदीप भोईर, अजय ठाकूर, पर्यवेक्षक निखिल कांबळे, विश्वास पाटील उपस्थित होते. पिल्लई कॉलेजच्या विद्यार्थ्यांची सद्‌गुरू वामनबाबा विद्यालय, घोटगाव येथे स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली होती. महापालिकेच्या वतीने शून्य कचरा मोहीम राबविण्यात आली.

या उपक्रमाद्वारे उपस्थित विद्यार्थ्यांना, नागरिकांना कचरा वर्गीकरणाबाबत महत्व पटवून देण्यात आले. प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, पिल्लई कॉलेजचे प्रा. रिझवी, एनएसएसचे विद्यार्थी, स्वच्छता निरीक्षक पराग, संदीप भोईर, अतुल मोहकर, पेंधर विभागमधील सर्व सुपरवायझर तसेच स्वच्छतादूत उपस्थित होते.

याबरोबच प्रभाग ७ रोडपाली विभागामध्ये सेक्टर १२मध्ये म्हसोबा तलाव येथे पालापाचोळा व नागरिकांनी टाकलेले हार असे तेथे निसर्गाकडून निसर्गाकडे अशी संकल्पना करून खत कुंडी (कंपोस्ट पीट) तयार करण्यात आली आहे.

# लोन मंजूर झाले सांगून फसवणूक करणारी टोळी गजाआड



**पनवेल : वार्ताहर**

लोन मंजूर झाले असे सांगून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीला मानपाडा पोलिसांनी गजाआड केले असून नऊ लाख २१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

अनिल कारभारी आव्हाड यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात फसवणुकीची तक्रार दाखल केली होती. ते रुमचे लोन घेण्यासाठी विविध बँकांमध्ये प्रयत्न करीत होते. त्यावेळी त्यांना आर. के. शर्मा नावाचे व्यक्तीचा फोन आला व तो बजाज फायनॅन्समधून बोलत असून, तुमचे नावावर १० लाखांचे लोन पास झाले असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांना बजाज फायनॅन्सचे फोन व मॅसेज वारंवार येऊ लागले, तसेच लोन पाहिजे असल्यास शशांक प्रसाद यांचे नांवे कोटक महिंद्रा, दिल्ली या बँकेचे अकाउंटवर प्रथम ३०,००० रु. प्रोसेसिंग फी भरावी लागेल असे सांगण्यात आले, त्याप्रमाणे त्यांनी लोन मंजुरीसाठी ३० हजार रु. शशांक प्रसाद यांचे अकाउंटवर पाठविले. त्यानंतर त्या इसमांनी त्यांना वारंवार तुमचे लोन २७ लाख रुपये मंजुर झाले आहे, त्यासाठी आणखी रक्कम भरणा करावी लागेल, असे सांगितल्याने, त्यांनी वारंवार वेगवेगळ्या खात्यावर फिर्यादींना पैसे पाठविण्यास भाग पाडले.

अशाप्रकारे या टोळीने अनिल कारभारी आव्हाड यांच्याकडून एकूण सात लाख ३४ हजार ५०० रुपये बळकावले. त्यांनी लोनचे संदर्भात विचारले असता, आणखी एक लाख रुपये भरणा करण्यास सांगितले. यानंतर मात्र अनिल कारभारी आव्हाड यांना आपली फसवणूक झाल्याचा संशय आल्याने त्यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

मानपाडा पोलिसांनी तातडीने तपासाला सुरुवात केली. फिर्यादींनी ज्या बँकांमध्ये पैसे भरणा केले आहेत त्याची माहिती प्राप्त करून, हे बँक अकाउंट लागलीच सिल करणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला. त्यावरून हे बँक अकाउंट सिल करण्यात आले.

अकाउंटवरील पत्त्यांची खात्री करण्यासाठी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार लागलीच नवी दिल्ली येथे रवाना झाले. त्यातील नमन संजय गुप्ता हा आरोपी अमृतसर येथे असल्याचे समजले. शोध घेतला असता, तो शिमला येथे गेल्याचे आढळले. त्याप्रमाणे शिमला, हिमाचल प्रदेश येथे जाऊन त्याला ताब्यात घेण्यात आले. या आरोपीकडे केलेल्या चौकशीत त्याचे साथीदार हे नोयडा, उत्तरप्रदेश व दिल्ली येथे राहत असल्याचे समजल्याने त्याने दिलेल्या माहितीवरून आकाशकुमार सुनिल चांदवानी यास दिल्ली येथून व रिशी दिपककुमार सिंग यास नोयडा येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

या तिन्ही आरोपींकडून सात लाख ३४ हजार ५०० रु., तसेच पाच मोबाईल फोन, एटीएम कार्ड असा एकूण नऊ लाख २१ हजार रु. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.





उलवे : उलवे सेक्टर १० येथे झिप्पीफीड या स्वप्नील विजय ठाकूर यांच्या कॅफेचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी उद्‌घाटन करण्यात आले. त्यांनी स्वप्नील ठाकूर यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या. या वेळी विजय ठाकूर, गजानन ठाकूर, शनिदास ठाकूर, किशोर ठाकूर, पी. एन. ठाकूर, लक्ष्मण ठाकूर, अमित कडू, मयूर ठाकूर, दिपेश ठाकूर, सदानंद घरत, गणपत घरत, रमेश घरत, कांतीलाल घरत, प्रदीप घरत उपस्थित होते. (छाया : विकास म्हात्रे)

## पनवेलमध्ये पत्रकारांसाठी आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समिती व रा. स्व. संघ जनकल्याण समिती, डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल, नवी मुंबईमधील सर्व पत्रकारांकरिता मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती व पत्रकार दिनाचे औचित्य साधून मोफत आरोग्य शिबिर ६ जानेवारी २०२३ रोजी डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय येथे आयोजित करण्यात आले आहे.

शिबिराचे उद्‌घाटन संपादक सुनील पोतदार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, विजय कडू, गणेश काळी, प्रमोद वालेकर, दीपक महाडिक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. पनवेल,नवी मुंबई मधील पत्रकारांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचे अध्यक्ष निलेश सोनावणे, कार्याध्यक्ष संजय कदम, सरचिटणीस संतोष सुतार यांनी केले आहे. शिबिर डॉ. प्रभाकर स्मृती रुग्णालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, पनवेल येथे होणार आहे. या शिबिरामध्ये सीबीसी, ईसीजी, इएनटी, बीपी., एचबीए १ सी या चाचण्या करण्यात येणार आहेत.



**पनवेल : पनवेल बार असोसिएशन कार्यकारिणी निवडणुकीमध्ये भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ माजी नगरसेवक मनोज भुजबळ विजयी झाल्याबद्दल भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर, साबीर शेख यांनी त्यांचा शाल, मानाची टोपी आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात बेस्ट आऊट ऑफ वेस्ट स्पर्धा

**खारघर : रामशेठ ठाकूर**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि. २२) व्यवस्थापन संघटनेतर्फे बेस्ट आऊट ऑफ वेस्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धा घेण्यामागचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांमध्ये जुन्या टाकाऊ वस्तूंचा वापर करून उपयोगी व टिकाऊ वस्तू बनवणे हा होता. स्पर्धेमध्ये २० गटांनी सहभाग घेतला व विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण कौशल्य सादर करीत विविध कलागुणांचे प्रदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या व स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.





कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून स्पर्धकांना प्रोत्साहन दिले व सहकार्य केले.

स्पर्धेचे आयोजन व्यवसाय व्यवस्थापन संघटनेच्या समन्वयक प्रा. रीत ठुले यांनी केले, तसेच प्रा. डॉ. धनवी आवटे, प्रा. अंकिता जागीड, प्रा. रेवन शिंदे, प्रा. विशाल देशमुख, प्रा. मीरा पटेल व प्रा. भाग्यश्री शुक्ला यांनी सहकार्य केले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

## द्रोणागिरी हायस्कूलमध्ये राष्ट्रीय गणित दिन साजरा

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या करंजा येथील द्रोणागिरी हायस्कूल या विद्यालयात गुरुवारी (दि. २२) थोर गणितीतज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन् यांच्या जन्मदिनानिमित्त राष्ट्रीय गणित दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

या वेळी विद्यालयात विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. विद्यालयात रांगोळी चित्रकला प्रश्नमंजुषा स्पर्धा अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.



जी. म्हात्रे व सर्व सेवकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते. गणित तज्ज्ञ रामानुजन् यांच्या प्रतिमेचे पूजन इ. सहावीतील विविध स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवलेली विद्यार्थिनी हनिषा अंकुश कोळी हिच्या हस्ते करण्यात आले. या वेळी एन. बी. म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# सिडकोच्या गृहनिर्माण योजनेत अर्ज करण्यासाठी मुदतवाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना दिवाळी-२०२२ या गृहनिर्माण योजनेस मिळत असलेल्या नागरिकांच्या उदंड प्रतिसादामुळे आणि नागरिकांना केलेल्या मागणीमुळे या योजनेकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यास ६ जानेवारी २०२३पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. या योजनेकरिता अर्ज नोंदणी करण्यास २२ डिसेंबर २०२२ ही अंतिम तारीख होती, परंतु अधिकाधिक नागरिकांना योजनेकरिता अर्ज करता येणे शक्य होऊन, त्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी योजनेस मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोतर्फे घेण्यात आला आहे. या अनुषंगाने अनामत रक्कम व शुल्क भरणा, संगणकीय सोडत या प्रक्रियांनाही मुदतवाढ देण्यात आली आहे.

सिडकोतर्फे या वर्षीच्या दिवाळीच्या शुभमुहूर्तावर २४ ऑक्टोबर २०२२ रोजी महागृहनिर्माण योजना दिवाळी-२०२२ अंतर्गत नवी मुंबईच्या उलवे नोडमधील बामणडोंगरी रेल्वे स्थानक, खारकोपर पूर्व २ए, खारकोपर पूर्व २बी आणि खारकोपर पूर्व २पी येथे ७,८४९ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या योजनेद्वारे झपाट्याने विकसित होत असलेल्या व परिवहनदृष्ट्या समृद्ध असलेल्या उलवे नोडमध्ये परवडणाऱ्या दरातील घर घेण्याची संधी नागरिकांना उपलब्ध झाली आहे.

या योजनेतील गृहसंकुलांना नेरूळ-उरण उपनगरीय रेल्वे मार्गावरील बामणडोंगरी व खारकोपर रेल्वे स्थानकांसह महामार्ग, प्रस्तावित एमटीएचएल महामार्ग यांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. तसेच सिडकोतर्फे विकसित करण्यात येत असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या गृहसंकुलांपासून नजीकच्या अंतरावर असल्याने उलवे नोडला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे.

सुधारित वेळापत्रकाप्रमाणे महागृहनिर्माण योजना दिवाळी-२०२२ करीता ऑनलाइन अर्ज नोंदणी ६ जानेवारी २०२३पर्यंत करता येणार आहे. ऑनलाइन अर्ज ७ जानेवारी २०२३पर्यंत सादर करता येणार आहेत. ऑनलाइन शुल्क भरणा ७ जानेवारी २०२३पर्यंत करता येणार आहे. स्वीकृत अर्जदारांची प्रारुप यादी १४ जानेवारी २०२३ रोजी तर स्वीकृत अर्जदारांची अंतिम यादी १८ जानेवारी २०२३ रोजी सिडकोच्या https://lottery.cidcoindia.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. योजनेची संगणकीय सोडत ३ फेब्रुवारी २०२३ रोजी पार पडणार आहे.

## श्री दत्त सह्याद्री आश्रमात धार्मिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुरु दत्तात्रेय स्वरूप गणपती सच्चितानदा स्वामी हे शुक्रवारी (दि. २३) श्री दत्त सह्याद्री आश्रम, चिंचवण येथे येणार असून २५ डिसेंबरच्या संध्याकाळपर्यंत येथेच मुक्काम करतील. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यादरम्यान शनिवारी (दि. २४) सकाळी ९.३० वाजल्यापासून श्री बालाजी कल्याणम होणार आहे, रविवारी (दि. २५) स्वामीजी स्वत: श्री गुरुनिलय निर्मिती कार्यक्रमाचे भूमिपूजन करतील आणि स्वामींचा ८०वा वाढदिवस साजरा करतील. या दोन दिवसांत स्वामीजी मार्गदर्शन करणार आहेत. या दोन दिवसांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली जाते. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील विविध निवडक ठिकाणांहून वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे, तसेच पनवेल रेल्वेस्थानक, एसटी बसस्थानकापासून वाहतुकीची व्यवस्थाही आश्रमातर्फे करण्यात आली असल्याचे श्री दत्त सह्याद्री आश्रम व्यवस्थापनातर्फे सांगण्यात आले आहे.

## आदर्श राज्य पुस्तकाचे प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागनाथ डोलारे लिखीत आदर्श राज्य या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच पनवेल येथे ज्येष्ठ साहित्यिका ॲड. सुनिता जोशी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व रंजना करकरे यांच्या प्रार्थनेने झाली.

प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ गजलकार ए. के. शेख हे उपस्थित होते. हा कार्यक्रम ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अविनाश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी कोमसाप पनवेलशाखेचे खजिनदार काशिनाथ जाधव, साहित्यिका मीनल वसमतकर, सामाजिक कार्यकर्ते व भीमप्रेरणा सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे, ज्येष्ठ गजलकार दिवाकर वैशंपायन हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक कोमसाप पनवेलचे अध्यक्ष रोहिदास पोटे यांनी केले, तर लेखक नागनाथ डोलारे यांनी सर्व पाहुण्यांचा सत्कार केला.

प्रमुख वक्ते दिवाकर वैशंपायन यांनी नागनाथ डोलारे यांचा जीवन संघर्ष सांगून पुस्तकातील विविध पैलू कथन केले. ॲड. सुनिता जोशी यांनी पुस्तकातील विषय मांडणी व विषयाची महती सांगितली आणि या पुस्तकातील शैलीचे कौतुक केले. ज्येष्ठ गजलकार ए. के. शेख यांनी लेखकाचा जीवनपट सांगून आदर्शत्वातील पुस्तकातील मर्मस्थळे सांगितली. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अविनाश पाटील यांनी पुस्तकांचा गोषवारा सांगून आजच्या परिस्थितीत या पुस्तकाचे विषयानुरूप महत्त्व विशद केले. सर्व उपस्थित पाहुण्यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रम कोमसाप पनवेल व पंचशील तरुण मंडळ सावरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला प्राचार्य पी. एल. गायकवाड, फुले आंबेडकर व्याख्यानमालेचे कार्यवाह एम. एन. वाघमारे व रसिक उपस्थित होते.

## संपादकीय

# जनामनाची लाज

महाराष्ट्रातील राजकारणात सध्या हे काय चालले आहे. राजकारणातील मतभेद, वितंडवाद समजून घेण्याजोगा असतो, परंतु मतभेदाचा अर्थ शत्रुत्व नव्हे. आपल्या नाकाखालून सत्ता काढून घेण्यात आली याची प्रचंड खदखद महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या मनात आहे. त्यांच्या भाषेतून ती वारंवार उघड होत असते.

**केवळ सत्तेचे लोणी खाण्यासाठी एकत्र आलेल्या तीन पक्षांच्या महाविकास आघाडीच्या नेत्यांना विरोधी बाकांवर बसणे अवघड जात आहे हे एव्हाना महाराष्ट्राच्या जनतेच्या लक्षात येऊ लागले आहे. एकनाथ शिंदे यांनी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांच्या साथीने महाविकास आघाडीला जबरदस्त झटका देत सत्तेवरून पायउतार केले, तेव्हापासून महाविकास आघाडीच्या नेत्यांची अवस्था पाण्यावाचून तडफडणाऱ्या मासोळीसारखी झालेली आहे. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या भाषेतून उमटताना दिसते. सत्तेवर असताना महाविकास आघाडीच्या नेत्यांनी महामहीम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा अपमान करण्याची एकही संधी सोडली नव्हती, किंबहुना बेजबाबदार वक्तव्यांबद्दल त्यांच्यामध्ये चढाओढच लागली होती. सचिन वाझे हा बिन लादेन तर नाही ना, असा प्रतिसवाल करण्यापर्यंत महाविकास आघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांची मजल गेली होती. गेल्या तीन वर्षांत या नेत्यांची वादग्रस्त वक्तव्ये आठवून पाहिली तर त्याची यादी लांबलचक होईल. तेव्हा त्यात पडायला नको. तथापि विधिमंडळाच्या सभागृहात अध्यक्षांना उद्देशून असंसदीय भाषा वापरण्याचा पराक्रम गुरुवारी नागपूर अधिवेशनात नोंदवला गेला. तोदेखील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या नावावर. माननीय जयंतराव हे सुजाण, सुशिक्षित आणि सुसंस्कृत नेत्यांमध्ये गणले जातात. मृदू स्वभावाचे जयंतराव राजकारण करताना सभ्यपणाची मर्यादा ओलांडताना कधीही दिसले नाहीत, पण गुरुवारी मात्र त्यांचादेखील तोल गेला असेच म्हणावे लागेल. नागपूरनजीकच्या हरपूर येथील भूखंडवाटपाच्या प्रकरणावर चर्चा घडवून आणण्याचा विरोधकांचा प्रयत्न होता. वास्तविक या प्रकरणी स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्य ती वस्तुस्थिती आधीच मांडली आहे. मुळात विरोधी पक्ष जसे भासवत आहेत, तसे हे भ्रष्टाचाराचे प्रकरणच नाही. १०२ कोटी रुपये किमतीचा भूखंड दोन कोटी रुपयांना कसा वाटला गेला असा हा सवाल आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर अधिक भाष्य करणे योग्य ठरणार नाही. याच कारणामुळे सभागृहामध्ये चर्चा टाळावी असे बहुतेक सदस्यांचे मत होते. तथापि या प्रकरणी शिवसेनेचे कोकणातील आमदार भास्कर जाधवदेखील बोलायचा प्रयत्न करीत होते. अध्यक्षांनी त्यांना सभागृहात बोलण्याची परवानगी न दिल्यामुळे संतापलेल्या जयंतराव पाटील यांनी 'असा निर्लज्जपणा करू नका' असे असंसदीय भाषेत वक्तव्य केले. यामुळे सत्ताधारी बाकांवर प्रचंड संताप बघायला मिळाला. एरव्ही शांत व हसतमुख असणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही रुद्रावतार या वेळी बघायला मिळाला. अखेर या संपूर्ण प्रकाराची परिणती जयंतराव पाटील यांच्या निलंबनात झाली. अधिवेशन संपेपर्यंत त्यांना विधानभवनाच्या आवारात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षातील नेत्यांचा तोल जाणे कदाचित कुणाला स्वाभाविक वाटू शकेल, कारण अलीकडच्या घडामोडींमध्ये सर्वाधिक राजकीय नुकसान त्यांनाच भोगावे लागले आहे, पण राष्ट्रवादी काँग्रेसच्या जुन्या-जाणत्या नेत्यांनी तरी आपल्या भाषेचे भान ठेवायला हवे होते. गुरुवारी हे भान सुटताना दिसले.**

# महाआरोग्य योजना-सार्वजनिक आरोग्य योजना व कार्यक्रम

आरोग्यसेवांचा मूळ उद्देश आरोग्य सुधारणे हा असून लोकांचे जीवनमान सुधारावे व निरोगीपणे जगता यावे यासाठी आरोग्य शिक्षण व सेवा यावर भर देण्यात आला आहे. आरोग्यसेवा हे सामाजिक आरोग्य क्षेत्र. यात प्राथमिक आरोग्य सेवा, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचाही समावेश होतो. या माध्यमातून लोकांना आरोग्य सेवांची उपलब्धता करून देण्यात येते. सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून शासनाच्या वतीने त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध योजना आखण्यात आलेल्या आहेत. या आरोग्यसेवा अधिकाधिक लोकाभिमुख झाल्यास लोकांना चांगले आरोग्य लाभून समाजाचे आरोग्य सुधारण्यासाठी नक्कीच मदत होऊ शकते.

सामाजिक क्षेत्राबरोबरच स्वयंसेवी संस्था व खासगी क्षेत्र या माध्यमातून अंगीकृत रुग्णालयातून आपल्या सेवा या देत असतात त्या सेवांशीही शासन सामाजिक आरोग्य क्षेत्राशी जोडण्याचा प्रयत्न करीत आलेले आहे. निरोगी महाराष्ट्राच्या दृष्टीने विविध महाआरोग्य योजना सामान्य माणसासाठी शासनाच्या वतीने साकारलेल्या आहेत. या लोककल्याणकारी योजनांची माहिती देऊन लोकांनी त्याचा अधिकाधिक उपयोग घेण्यासाठी व त्या लोकाभिमुख करण्यासाठी शासनाचा प्रयत्न आहे, यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांचेदेखील मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे, असे मनोगत आरोग्यसेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबईच्या संचालक, डॉ.साधना तायडे तसेच आरोग्य सेवा, पुणेचे संचालक, डॉ. नितीन अंबाडेकर यांनी नोव्हेंबर २०२२च्या महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेच्या महाआरोग्य योजना-सार्वजनिक आरोग्य योजना व कार्यक्रम या विशेषांकातून व्यक्त केले आहे. या पुस्तिकेचे संपादन डॉ. कैलास बाविस्कर यांनी केले आहे. चला तर जाणू घेऊया काय आहेत या आरोग्य योजना, काय आहेत या योजनांचे लाभ.

**जननी सुरक्षा योजना**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्र्यरेषेखालील सर्व गर्भवती महिला या योजनेसाठी लाभार्थी म्हणून पात्र आहेत. ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्यरेषेखालील लाभार्थीची प्रसूती घरी झाल्यास ५०० रुपये शहरी भागातील लाभार्थीची प्रसूती शासकीय किंवा शासनमान्य मानांकित आरोग्य संस्थेत झाल्यास ६०० रुपये ग्रामीण भागातील लाभार्थीची प्रसूती शासकीय किंवा शासनमान्य मानांकित आरोग्य संस्थेत झाल्यास ७०० रुपये, तर सिझेरिअन शस्त्रक्रिया झाल्यास लाभार्थीस एक हजार ५०० रुपयांचा लाभ देय आहे. या योजनेचा लाभ हा लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर डीबीटी, पीएफएमएसद्वारे धनादेशाद्वारे देण्यात येतो. सेवा मिळण्याचे ठिकाण प्रसूती सेवा उपलब्ध असलेल्या सर्व शासकीय आरोग्य संस्था व शासन मानांकित खासगी आरोग्य संस्था. सेवा मिळण्यासाठी रहिवासी दाखला, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला ही कागदपत्रे आवश्यक आहेत. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर प्रसूतीनंतर सात दिवसांच्या आत सेवा योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या जवळच्या आशा, आरोग्य सेविका किंवा जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

**जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम**

या योजनेंतर्गत गरोदर मातेस व प्रसूती पश्चात ४२ दिवसांपर्यंत मोफत सुविधा देण्यात येतात. प्रसूती, सिझेरीयन शस्त्रक्रिया, प्रसूती संदर्भातील, गरोदरपणातील व प्रसूती पश्चात आवश्यक औषधे व साहित्य, प्रयोगशाळेतील तपासण्या, प्रसूती पश्चात आहार (स्वाभाविक प्रसूती' तीन दिवस सिझेरीयन प्रसूती सात दिवस) मोफत रक्तसंक्रमण, घरापासून आरोग्य संस्थेपर्यंत, एका आरोग्य संस्थेतून दुसऱ्या आरोग्य संस्थेत तसेच आरोग्य संस्थेतून घरापर्यंत वाहतूक व्यवस्था करण्यात येते तसेच या योजनेंतर्गत एका वर्षापर्यंतच्या आजारी बालकास उपचारासाठी आवश्यक औषध व साहित्य, प्रयोगशाळेतील तपासण्या, मोफत रक्तसंक्रमण, घरापासून आरोग्य संस्थेपर्यंत, एका आरोग्य संस्थेतून दुसऱ्या आरोग्य संस्थेत तसेच आरोग्य संस्थेतून घरापर्यंत वाहतूक व्यवस्था या सुविधा मोफत देण्यात येतात.

**सेवा मिळावयाचे ठिकाण**

संबंधित शासकीय आरोग्य संस्था आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर गरोदरपणाच्या काळात, प्रसूती दरम्यान, प्रसूतीनंतर ४२ दिवसांपर्यंत व एक वर्ष वयापर्यंतच्या आजारी बालकास सेवा पुरविली जाते. प्रधानमंत्री मातृवंदना योजना कुटुंबातील पहिल्या जीवित अपत्यासाठी गर्भवती माता व स्तनदा मातांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे. (वेतनासह मातृत्व रजा मिळणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही). या योजनेंतर्गत गर्भवती माता व स्तनदा मातांना पाच हजार रुपयांची रक्कम तीन टप्प्यांमध्ये (काही निकष पूर्ण केल्यानंतर) थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. सेवा मिळावयाचे ठिकाण- राज्यातील सर्व आरोग्य संस्था (ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे). सेवा मिळण्यासाठी जोडावयाची विहित कागदपत्रे-माता आणि बाल सुरक्षा कार्ड, लाभार्थी आणि तिच्या पतीच्या आधारकार्डची झेरॉक्स, लाभार्थीच्या स्वतंत्र बँक पासबुकची झेरॉक्स आणि नवजात बालकाचे जन्मनोंदणी प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल. फॉर्म नोंदणी आणि कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर लाभार्थीची माहिती केंद्र शासनाच्या पोर्टलवर भरल्यानंतर किमान ३० दिवसांच्या आत लाभार्थीच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा केली जाते.

लक्ष्य (प्रसूतीगृह (Labour rooms) आणि माता शस्त्रक्रियागृह (Maternity OTs) मध्ये गुणवत्ता सुधारणा) LaQshya (Labour Room quality improvement initiative) हा कार्यक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार संपूर्ण महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, सामान्य रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रसूतीगृह/मातृत्व शस्त्रक्रियागृह यांच्याकरिता सर्व स्तरांवर विविध समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

**ध्येय**

माता व बालकांमधील प्रतिबंधात्मक मृत्यू, विकृती व उपजत मृत्यू कमी करणे. प्रसूतीच्या वेळी व प्रसूतीपश्चात लगेचच दिल्या जाणाऱ्या सुविधांची गुणवत्ता वाढविणे. लाभार्थ्यांची वाढ करणे, आदरयुक्त मातृत्व देखभाल सेवा देणे. (Respectful Maternity Care).

**कार्यक्रमाचे प्रमुख उद्देश**

या कार्यक्रमांतर्गत प्रसूतीगृह (Labour rooms) आणि माता शस्त्रक्रियागृह (Maternity OTs) आयसीयू, एच.डी.यू. (High Dependancy Unit) या सर्वामध्ये गुणवत्ता सुधारणा करून त्याद्वारे माता आणि नवजात अर्भकांना प्रसूती दरम्यान व प्रसूतीपश्चात दर्जात्मक सेवा पुरविणे. सर्व वैद्यकीय शासकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालय व प्राथमिक संदर्भ सेवा रुग्णालय यांना कार्यान्वित करणे, या कार्यक्रमांतर्गत समाविष्ट केलेल्या सर्व बाबींचा आवश्यक वेळेनुसार कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

**लक्ष्य अंमलबजावणी/कार्यक्रम**

लक्ष्य कार्यक्रमामध्ये प्रसूती दरम्यान विशिष्ट सोयी देण्यासाठी सर्व वैद्यकीय शासकीय महाविद्यालये व जिल्हा रुग्णालय स्तरावर प्रसूतीगृह HDU स्थापन करण्यात येत आहेत. प्रसूतीगृह (Labour rooms) आणि माता शस्त्रक्रियागृह (Maternity OTs) मध्ये गुणवता सुधारणा करून घेण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील मानकांप्रमाणे मूल्यांकन करून घेण्यात येते.

राष्ट्रीय स्तरावरील मानकांप्रमाणे (NQ-S) संस्थेला जर ७० % पेक्षा जास्त गुण मिळाले राष्ट्रीय स्तरावरून प्रमाणपत्र देण्यात येते. राष्ट्रीय स्तरावरील मानकांप्रमाणे (NQ-S) संस्थेचे वर्गीकरण केले जाईल. यामध्ये ९०%, ८०% व ७% असे गुणांकन केले जाते व यामध्ये Silver Badge, Gold Badge व Platinum Badge असे rading केले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या जवळच्या आशा, आरोग्यसेविका, अंगणवाडी सेविका किंवा जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

या लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय arogyapatrikamhgmail.com या ई-मेलवर तसेच पत्रव्यवहारासाठी मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे-४११००६ येथे संपर्क साधावा.

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**




## सेव्ह नसलेल्या नंबरवरही पाठवू शकता व्हॉट्सअ‍ॅप मेसेज



जो संपर्क क्रमांक तुमच्या स्मार्टफोनच्या कॉन्टॅक्ट लिस्टमध्येच नाही त्याला कसे व्हॉट्सअ‍ॅपने मॅसेज पाठवता येईल? असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल, तर आज आपण हे कसे शक्य होऊ शकते याबाबत जाणून घेऊया.

व्हॉट्सअ‍ॅप हे त्याच्या फिचरमुळे दिवसेंदिवस लोकप्रिय होत चालले आहे. अलीकडेच व्हॉट्सअ‍ॅपने अंडू फीचर सादर केले. या फीचरचा वापर केल्यास डिलीट झालेले मेसेज परत दिसून येतात तसेच आता व्हिडिओ कॉलमध्ये ३२ व्यक्ती सहभाग घेऊ शकतात आणि ग्रुपमध्ये एक हजारांहून अधिक लोकांचा समावेश करता येतो. यामुळे व्हॉट्सअ‍ॅप मेसेज करण्याव्यतिरिक्त इतर फीचर्स देत असल्याने त्याचे युजर्स वाढत आहेत.

व्हॉट्सअ‍ॅपवर सेव असलेल्या क्रमांकावर तुम्ही मेसेज पाठवू शकता हे तुम्हाला ठावूकच असेल, पण जो संपर्क क्रमांक तुमच्या स्मार्टफोनच्या कॉन्टॅक्ट लिस्टमध्येच नाही त्याला कसे व्हॉट्सअ‍ॅपने मॅसेज पाठवता येईल? असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल, तर आज आपण हे कसे शक्य होऊ शकते याबाबत जाणून घेऊया.

जर कोणी तुम्हाला त्याचा संपर्क क्रमांक सेव्ह करण्यासाठी दिला असेल आणि तो तुम्ही सेव्ह करायचे विसरला असाल किंवा तुम्हाला तसे करायचेच नसेल तरी असे असताना तुम्ही त्या व्यक्तीला मेसेज पाठवू शकता. यासाठी मेटाचे अलीकडेच लाँच झालेले मेसेज युवरसेल्फ फीचरची आवश्यकता आहे. या फीचरद्वारे तुम्ही स्वत:ला मेसेज करू शकता.

* सेव्ह नसलेल्या क्रमांकावर मेसेज पाठवण्यासाठी पुढील स्टेप्स फॉलो करा
* 'मेसेझ युअरसेल्फ' चॅटवर टॅप करा आणि ज्या संपर्क क्रमांकावर तुम्हाला मेसेज करायचे हे तो संपर्क क्रमांक टाईप करा आणि स्वत:ला सेंड करा.
* आता हा संपर्क क्रमांक तुम्हाला निळ्या रांगामध्ये दिसून येईल. संपर्क क्रमांकावर टॅप केल्यावर तुम्हाला 'चॅट विथ फोन नंबर', 'कॉल ऑन व्हॉट्सअ‍ॅप', 'अ‍ॅड टू कॉन्टॅक्ट्स' हे पर्याय दिसून येतील.
* पहिले पर्याय निवडल्यावर एक चॅट विंडो उघडेल. या विंडोतून तुम्ही सेव्ह ने केलेल्या संपर्क क्रमांकावर मेसेज करू शकता.

# संगीतकार दत्ता कोरगावकर



**निमित्त**

संगीतातील ज्येष्ठतेमुळे संगीतकार सी. रामचंद्र, वसंत देसाई, दत्ता डावजेकर वगैरे मराठी संगीतकारांकडून वारंवार वाहवा मिळवणारे संगीतकार म्हणजे के. दत्ता. चित्रपटसृष्टीत के. दत्ता म्हणून परिचित असणारे दत्ता कोरगावकर यांचे घराणे सातारा जिल्ह्यातील कोरेगावचे. गावातले कुलकर्णीपण करणारे त्यांचे आजोबा गोव्यामध्ये जाऊन राहिले. तेथेच के. दत्ता यांचा जन्म झाला. दत्ता कोरगावकर यांचे वडील वारंवार नोकरी बदलत असल्यामुळे पडणाऱ्या शिक्षणातील खंडामुळे सावंतवाडी येथे कायमचे बिऱ्हाड करण्याचे ठरवले. म्हणून दत्ता यांचे शालेय शिक्षण सावंतवाडी येथेच पार पडले. तेथेच त्यांच्या घराशेजारी एक गवई राहत. त्या गवयाचा रियाझ ऐकून दत्ता यांनाही संगीताची गोडी लागली. ते हार्मोनियम व पायपेटी वाजवून गाणे म्हणू लागले.

शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षणासाठी व सोबत नोकरी करण्याच्या निमित्ताने दत्ता मुंबईत स्थिरावले, पण शिक्षणापेक्षा संगीताकडे त्यांचा कल असल्याने ते गांधर्व महाविद्यालयामध्ये व बी. आर. देवधरांच्या संगीताच्या शिकवण्यांमध्ये जास्त वेळ उमेदवारी करत असल्यामुळे त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण संपुष्टात आले व त्यांना संगीताची दारे खुली झाली.

१९३७च्या दरम्यान विनायक मुंबईत फिल्म सिटीत 'धर्मवीर' या चित्रपटाचे चित्रीकरण करीत होते, तेव्हा दत्ता यांच्या तेथे वाऱ्या चालत. या दरम्यानच चित्रपटाची नायिका थोडी बेसूर होत असल्याचे दत्ता यांनी संगीत दिग्दर्शक अण्णासाहेब माईणकर यांच्या नजरेस आणून दिले. त्यांची संगीतातील जाण बघून खूश झालेल्या विनायक यांनी त्यांचे नाव चित्रपटाच्या हजेरी पटावर लावून घेतले. पुढे 'प्रेमवीर' या चित्रपटाच्या वेळेसही ते हजेरी पटावर होते. 'प्रेमवीर' या चित्रपटापासून मराठी चित्रपटात पार्श्वगायनाची सुरूवात झाली. विनायक १९३८मध्ये 'ब्रम्हचारी' या चित्रपटाच्या निमित्ताने कोल्हापूरला आले. त्याच स्टुडिओत सुरू असलेल्या 'चंद्रराव मोरे' नावाच्या मराठी चित्रपटासाठी संगीत दिग्दर्शक म्हणून विनायक यांनी के. दत्ता यांच्या नावाची शिफारस केली. हाच त्यांचा पहिला स्वतंत्र चित्रपट. याच वेळी त्यांनी दत्ता कोरगावकर हे मूळ नाव बदलून के. दत्ता हे नाव धारण केले.

हंस पिक्चर्सतर्फे १९३९मध्ये मराठीत 'सुखाचा शोध' तर हिंदीत 'मेरा हक' हे चित्रपट प्रदर्शित झाले. या दोन्ही चित्रपटांना के. दत्ता यांचेच संगीत होते. त्यानंतर सिर्को कंपनीचा 'गीता' (हिंदी/मराठी) 'गोरा कुंभार', भालजी पेंढारकरांचे 'गोरखनाथ' (मराठी), 'अलख निरंजन' (हिंदी), 'सूनबाई', 'महात्मा विदुर' (हिंदी/मराठी) असे अनेक चित्रपट दत्ता यांनी केले. नंतरच्या काळात ते प्रामुख्याने हिंदीत स्थिरावले. नूरजहाँची चार गाणी असलेला 'नादान', मझहर खान यांचा 'याद', मा. विनायक यांचा 'बडी माँ' हे चित्रपटही के. दत्ता यांनी केले. 'बडी माँ'मध्ये नायिका नूरजहाँ असली तरी लता मंगेशकर यांची या चित्रपटात छोटीशी भूमिका होती. तेव्हा या चित्रपटाचे संगीत खूप गाजले.

के. दत्ता यांनी मराठी चित्रपटांनाही संगीत दिले होते. त्यात बाबूराव पै यांच्या 'गळ्याची शपथ'तसेच 'जमीन' व 'महारथी कर्ण' या चित्रपटाचेही संगीत दिग्दर्शन केले. पुढे 'सोनेरी सावली' व 'कलगी तुरा' या चित्रपटानंतर बऱ्याच कालावधीने त्यांनी 'रायगडचा राजबंदी' हा चित्रपट केला. तोच त्यांच्या अखेरचा मराठी चित्रपट. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना 'अजनबी' या (हिंदी) चित्रपटाचे संगीत अर्धवट सोडावे लागले. मुंबई येथे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

**-शशिकांत किणीकर**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : सध्या हिवाळा सुरू असून वातावरण आल्हाददायक बनले आहे. मध्यंतरी हवामान बदलल्यामुळे उष्मा निर्माण झाला होता, परंतु आता थंडीचे पुनरागमन झाले आहे. अशा वेळी थळ समुद्रकिनारी फिरताना रम्य वाटते.** (छाया : भैरवी रावले)

## आरोग्य प्रहर

## सकाळी उपाशीपोटी पाणी पिण्याचे फायदे...



आपल्यापैकी अनेकांच्या दिवसाची सुरुवात ब्रश केल्या केल्या गरम वाफाळत्या चहा किंवा कॉफीने होते. प्रमाणित योग प्रशिक्षक आणि होमिओपॅथिक डॉक्टर डॉ. नूपोर रोहतगी यांच्या माहितीनुसार चहा, कॉफी, नाष्टा किंवा अगदी ब्रश करण्याआधी सुद्धा आपण एक ग्लास पाण्याने सकाळची सुरुवात करणे ठरू शकते. आपल्या शरीराला नेमकं किती प्रमाणात पाण्याची गरज आहे या विषयी अनेकजण सांगतात, पण नेमक्या कोणत्या वेळी तुम्ही पाणी प्यायला हवे हे मात्र सांगितले जात नाही. डॉ. रोहतगी यांनी आपल्या इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये याविषयीच माहिती दिली आहे.

डॉ. रोहतगी सांगतात की, कामाच्या व्यापात दिवसभर पाणी पिणं शक्य होईलच असे नाही. पण कोणतेही काम सुरु करण्यापूर्वीच जर आपण शरीर हायड्रेट करण्याची सवय लावून घेतली तर शरीराचे तापमान नियंत्रणात राहू शकते. याशिवाय मूत्रपिंडातील कचरा बाहेर काढणे, लाळ तयार करणे आणि शरीराच्या विविध अवयवांना पोषक तत्वे उपलब्ध करून देणे यासारखी शारीरिक कार्ये देखील सुरळीत होऊ शकतात. यासाठी सकाळी झोपेतून उठताच पाणी पिणे आवश्यक आहे.

फिटनेस तज्ज्ञ सोनिया बक्षी यांनीही झोपेतून उठल्यावर किमान एक ग्लास पाणी पिण्याचा सल्ला दिला. हे आजारांशी लढण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करू शकते, असे त्यांनी इन्स्टाग्रामवर एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

**हे होतात फायदे...**

व्यक्ती झोपेत असताना तोंडात बॅक्टेरिया तयार होतात; जेव्हा तुम्ही सकाळी पाणी पितात तेव्हा तुम्ही ते बॅक्टेरिया पाण्यासह निघून जातात. यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

* अपचनाची समस्या दूर होऊन पचन सुधारण्यास मदत होते.
* उच्च रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते.
* रिकाम्या पोटी पाणी प्यायल्याने तोंडाची दुर्गंधी कमी होऊन तोंडाचे आरोग्यही नियंत्रित राहते.
* पाण्यामुळे तोंडात आवश्यक लाल तयार होते, ज्यामुळे तोंड व घसा कोरडा पडणे असा त्रास होत नाही.

**सकाळी पाणी कसे व किती प्यावे?**

रिकाम्या पोटी कोमट पाणी पिण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात. उठल्याबरोबर निदान एक व जास्तीत जास्त दोन ग्लास पाणी प्या. पाणी पिताना घाई करू नका, स्वस्थ बसा आणि एक एक घोट पाणी प्या.

## पनवेल महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग

दिनांक. २२/१२/२०२२

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, सोमवार दि. २६/१२/२०२२ रोजी पासुन पनवेल शहरामध्ये जलकुंभ निहाय आठवडयातुन एक दिवस पाणीपुरवठा बंद राहणार आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे .......

| अ.क्र. | जलकुंभाचे ठिकाण | वार | पाणी पुरवठा बंद / चालु |
|---|---|---|---|
| १ | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | सोमवार | अर्धा भाग चालु / अर्धा भाग बंद |
| २ | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | मंगळवार | अर्धा भाग बंद / अर्धा भाग चालु |
| ३ | भाजी मार्केट उंच जलकुंभ | सोमवार | भाजी मार्केट उंच जलकुंभातून पुर्ण दिवस पाणीपुरवठा बंद |
| ४ | मार्केट यार्ड उंच जलकुंभ | सोमवार | मार्केट यार्ड उंच जलकुंभातुन पुर्ण दिवस पाणीपुरवठा बंद |
| ५ | पटेल मोहल्ला उंच जलकुंभ | मंगळवार | पटेल मोहल्ला उंच जलकुंभातुन पुर्ण दिवस पाणीपुरवठा बंद |
| ६ | सर्व जलकुंभातुन पाणी सुरु | बुधवार | सर्व जलकुंभातुन पाणी सुरु |
| ७ | ठाणा नाका उंच जलकुंभ व हरिओम नगर बायपास | गुरुवार | ठाणा नाका उंचजलकुंभातुन व हरिओम नगर बायपास पुर्ण दिवस पाणीपुरवठा बंद |
| ८ | सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ/गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ | गुरुवार | अर्धा भाग चालु / व अर्धा भाग बंद |
| ९ | सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ/गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ | शुक्रवार | अर्धा भाग बंद / व अर्धा भाग चालु |
| १० | सर्व जलकुंभातुन पाणी सुरु | शनिवार | सर्व जलकुंभातुन पाणी सुरु |
| ११ | सर्व जलकुंभातुन पाणी सुरु | रविवार | सर्व जलकुंभातुन पाणी सुरु |

**सही/-**
**अभियंता पायाभूत सोई सुविधा**
**पनवेल महानगरपालिका**

**सही/-**
**उप अभियंता,**
**पनवेल महानगरपालिका**

## पनवेल महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग
## ''नागरिकांना जाहिर आवाहन''

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, शहरास होणारा पाणी पुरवठा हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ व देहरंग धरण मिळून एकत्रितपणे करण्यात येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ या संस्थेस पाताळगंगा नदीतुन दर रविवार व सोमवार या दिवशी कमी पाणी मिळते व इतर काळात इलेक्ट्रिक शटडाऊन, ब्रेकडाऊनमुळे दोन्ही संस्थेकडून वारंवार कमी पाणी मिळत असल्याने देहरंग धरणाचे जास्त पाणी घेवून शहराची दररोजची गरज भागविण्यात येते. परंतु त्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी झाला, ही वस्तूस्थिती विचारात घेता धरणातील शिल्लक असलेला पाणीसाठा माहे १५ जून २०२३ पर्यंत पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या दृष्टीने **सोमवार दि.२६/१२/२०२२** रोजीपासून पनवेल शहरामध्ये उंच जलकुंभ निहाय एक भाग आठवडयातून एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | वार | उंच जलकुंभाचे ठिकाण | पाणीपुरवठा बंद राहणाऱ्या भागाचे नाव | पाणीपुरवठा सुरु राहणाऱ्या भागाचे नाव व वेळ | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वेळ | पाणी सुरु राहणारा भाग |
| 1 | सोमवार | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | सुभेदार वाडा, गुणे हॉस्पिटल, शिवसेना कार्यालय ते भैरवनाथ डेअरी पर्यंत, भैरवनाथ डेरी ते ससाने हॉस्पिटल पर्यंत, अशोका गार्डन सोसा. मेवाड हॉटेल ते मशीद पर्यंत, अर्बन को. ऑप. बँक ते साई पार्क, अर्बन को.ऑप. बँक ते गणपती परिसर, गुडेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत घाटे आळी, गावदेवी मंदिर परिसर, गुडेकर डेअरी ते पनवेल पॅलेस पर्यंत, परदेशी आळी ते अंबर सोसा. पर्यंत, गावदेवी पाडा भाग, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल, दांडेकर हॉस्पिटल ते अचुत मनोरे यांच्या घरा पर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, परदेशी आळी सर्व बैठी घरे, मेन व्हॉल ,रचना रेसीडेन्सी सोसा. अष्टविनायक कॉलनी सर्व परिसर, गुणे हॉस्पिटल ते श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळया पर्यंत. श्री लॉज ते निलेटा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा सर्व बैठी घरे, आदर्श हॉटेल ते श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळया पर्यंत इत्यादी. | सकाळी 5.30 ते सकाळी 7.00 | माणिक नगर, स्नेहसदन सोसा., येशोदिप सोसा. |
| | | | | सकाळी 5.30 ते सकाळी 6.45 पर्यंत<br>सकाळी 6.00 ते सकाळी 7.30 | पटेल पार्क भाग, उपजिल्हा रुग्णालय,<br>केशव बाग (KVK) |
| | | | | सकाळी 6.45 ते सकाळी 8.00 पर्यंत | जैन मंदिर पासुन भुसार मोहल्ला बैठी घर. |
| | | | | सकाळी 8.00 ते सकाळी 9.30 पर्यंत | पंचायत समिती झोपडपटटी, कोहिनूर टेक्निकल ते किंग इलेक्ट्रोनिक पर्यंत, कोहिनुर टेक्निकल ते नवनाथ मंदिरा पर्यंत,लक्ष्मीवसाहत |
| | | | यशोपुरम सोसा. आगरी समाज ते व्हि.के. हायस्कुल पर्यंत जुने पोस्ट ते डॉ. बुधकर दवाखान्या पर्यंत श्री गांगल यांच्या घरापर्यंत ते महाड बँक जय भारत नाका ते मेवाड हॉटेल पर्यंत, जय भारत नाका ते भिंडे यांच्या घरा पर्यंत, घोडसे आळी बैठी घरे, विरुपाक्ष मंदिर ते लोंढे मॅडम यांच्या घरा पर्यंत, आदर्श हॉटेल ते आदित्य कॉम्पलेक्स पर्यंत मनिष मार्केट, जय भारत नाका ते बैठी घरे, जैन मंदिर पर्यंत, जय भारत नाका ते रतन<br>टॉकिज पर्यंत, त्रिमुर्ती सहनिवास सोसा. अन्नपूर्णा हॉटेल ते निसर्ग बिल्डींग पर्यंत, गोखले हॉल ते प्रज्ञा सोसायटी पर्यंत, मालधक्का परिसर, नवनाथ झोपडपटटी, शिवाजी नगर झोपडपट्टी, सर्व्हिस हौद ते सम्राट हॉटेल पर्यंत, अंबिका नगर , लोकमान्य नगर इत्यादी | सकाळी 9.30 ते सकाळी 10.45 पर्यंत | मामलेदार कचेरी ते दत्तराज सोसायटी |
| | | | | सकाळी 10.45 ते दुपारी 12.00 पर्यंत | साठे गल्ली, विरुपाक्ष मंदिर ते साहिल सोसायटी पर्यंत, सिटी स्टोअर्स गल्ली, सिनियर ज्युनियर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, |
| | | | | दुपारी 12.00 ते दुपारी 1.15 पर्यंत | गायकर गल्ली सर्व बैठी घर,<br>शुभलाभ सोसा ते सहयोग नगर पर्यंत, |
| | | | | दुपारी 1.15 ते दुपारी 2.30 पर्यंत | सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटी पर्यंत, उमा शंकर सोसा. ते यशोवर्धन पर्यंत. |
| | | | | दुपारी 2.30 ते दुपारी 3.45 पर्यंत | आदर्श हॉटेल ते रत्नेश अपार्टमेंट पर्यंत |
| | | | | दुपारी 3.45 ते सायं. 5.00 | कुबेर सोसायटी ते शुभलाभ सोसायटी, धुतपापेश्वर ते मुनोथ नगर पर्यंत. |
| | | | | सायं 5.00 ते सायं. 6.15 | मुनोथ नगर ई विंग |
| | | | | सायं. 6.15 ते सायं. 9.15 | प्रिन्स पॅराडईज सोसा सनराईज सोसा. केशव सोसायटी. |
| 2 | मंगळवार | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | माणिक नगर, स्नेहसदन सोसायटी, येशोदिप सोसायटी, पटेल पार्क भाग, उपजिल्हा रुग्णालय, जैन मंदिर पासुन भुसार मोहल्ला बैठी घर, पंचायत समिती झोपडपटटी, कोहिनूर टेक्निकल ते किंग इलेक्ट्रोनिक पर्यंत, कोहिनुर टेक्निकल ते नवनाथ मंदिरा पर्यंत, मामलेदार कचेरी ते दत्तराज सोसायटी, साठे गल्ली, विरुपाक्ष मंदिर ते साहिल सोसायटी पर्यंत, सिटी स्टोर्स गल्ली, सिनियर ज्युनियर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, गायकर गल्ली सर्व बैठी घर, शुभलाभ सोसा ते सहयोग नगर पर्यंत, सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटी पर्यंत, उमा शंकर सोसा. ते यशोवर्धन पर्यंत. आदर्श हॉटेल ते रत्नेश अपार्टमेंट पर्यंत, कुबेर सोसायटी ते शुभलाभ सोसायटी, धुतपापेश्वर ते मुनोथ नगर पर्यंत. मुनोथ नगर ई विंग प्रिन्स पॅराडईज सोसा सनराईज सोसा. केशव सोसायटी. केशव बाग (KVK) इत्यादी | पहाटे 5.30 ते सकाळी 6.45 | शिवसेना कार्यालय ते भैरवनाथ डेअरी पर्यंत, अशोका गार्डन सोसा. |
| | | | | सकाळी 6.30 ते सकाळी 7.30 | मेवाड हॉटेल ते मशीद पर्यंत. |
| | | | | सकाळी 7.30 ते सकाळी 8.30 | अर्बन बँक ते साई पार्क |
| | | | | सकाळी 8.00 ते सकाळी 9.15 | अर्बन बँक ते गणपती परिसर |
| | | | | सकाळी 9.15 ते सकाळी 11.00 | श्री गांगल यांच्या घरापर्यंत ते महाड बँक जय भारत नाका ते भिंडे यांच्या घरा पर्यंत. |
| | | | | सकाळी 6.45 ते सकाळी 8.15 | गुडेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत घाटे आळी, गावदेवी परिसर |
| | | | | सकाळी 8.15 ते सकाळी 9.30 | गुडेकर डेअरी ते पनवेल पॅलेस पर्यंत, परदेशी आळी ते अंबर सोसा. पर्यंत, गावदेवी पाडा भाग |
| | | | | सकाळी 9.30 ते सकाळी 11.00 | गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल |
| | | | | सकाळी 11.15 ते दुपारी 12.30 | दांडेकर हॉस्पिटल ते अच्युत मनोरे यांच्या घरा पर्यंत , गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, परदेशी आळी सर्व बैठी घरे. घोडके आळी बैठी घरे, विरुपाक्ष मंदिर ते लोंढे मॅडम यांच्या घरा पर्यंत |
| | | | | दुपारी 12.30 ते दुपारी 1.45 | जय भारत नाका ते बैठी घरे पर्यंत जैन मंदिर पर्यंत |
| | | | | सकाळी 11.15 ते दुपारी 1.45 | आदर्श हॉटेल ते अदित्य कॉम्पलेक्स पर्यंत मनिष मार्केट |
| | | | | दुपारी 1.45 ते दुपारी 3.00 | जय भारत नाका ते रतन टॉकिज पर्यंत |
| | | | | दुपारी 3.00 ते दुपारी 4.15 | त्रिमुर्ती सहनिवास सोसा. |
| | | | | दुपारी 12.30 ते दुपारी 3.00 | मेन व्हॉल |
| | | | | दुपारी 3.00 ते सायं. 5.00 | अन्नपूर्णा हॉटेल ते निसर्ग बिल्डींग पर्यंत |
| | | | | सायं. 4.15 ते सांय. 5.30 | गोखले हॉल ते प्रज्ञा सोसायटी पर्यंत |
| | | | | दुपारी 12.30 ते दुपारी 1.45 | रचना रेसिडेन्सी सोसा. अष्ठविनायक कॉलनी सर्व परिसर,गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळया पर्यंत |
| | | | | दुपारी 1.45 ते दुपारी 3.00 | श्री लॉज जे निलेटा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा सर्व बैठी घरे, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पर्यंत |
| | | | | दुपारी 3.00 ते दुपारी 4.15 | यशोपुरम सोसा. आगरी समाज हॉल ते व्हि.के. हायस्कुल पर्यंत |
| | | | | दुपारी 4.15 ते सायं. 5.30 | जुने पोस्ट ते डॉ. बुधकर दवाखान्या पर्यंत |
| | | | | सायं. 4.00 ते सायं 6.00 | अंबिका नगर |
| 3 | सोमवार | मार्केट यार्ड उंच जलकुंभा | मार्केट यार्ड उंच जलकुंभातुन होणारा पाणी पुरवठा संपुर्ण बंद राहील. | ----------------- | मार्केट यार्ड उंच जलकुंभातुन होणारा पाणी पुरवठा बंद राहील. |
| 4 | सोमवार | भाजी मार्केट उंच जलकुंभ | भाजी मार्केट उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा संपुर्ण बंद राहिल | | भाजी मार्केट उंच जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा बंद राहिल |
| 5 | मंगळवार | पटेल मोहल्ला उंच जलकुंभ | पटेल मोहल्ला उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा संपुर्ण बंद राहिल | | पटेल मोहल्ला उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहिल. |
| 6 | बुधवार | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरु राहिल. | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरु राहिल. |
| 7 | गुरुवार | ठाणा नाका उंच जलकुंभ | ठाणा नाका उंच जलकुंभातून व पायोनिअर सोसायटी परिसर होणारा पाणीपुरवठा संपुर्ण बंद राहिल. | | ठाणा नाका उंच जलकुंभातून व पायोनिअर सोसायटी परिसर होणारा पाणीपुरवठा बंद राहिल. |
| 8 | गुरुवार | सर्व्हिस हौद नविन उंच जलकुंभ /गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ | सुनिल बहिरा ऑफिस ते उर्दु शाळा परिसर पर्यंत, पगडे आळी परिसर पर्यंत, तक्का गाव एकविरा मंदिर परिसर पर्यंत, तक्का गाव शाळा, परिसर व भगत आळी, सावंतामाळी हॉल परिसर, आझाद नगर झोपडपट्टी एन.के.हेरीटेज सोसा. साईबाबा मंदिर परिसर, निलसिध्दी गार्डन, न्यु इडन गार्डन सोसा. रिध्दी हाऊस व सिध्दी हाऊस सोसा. पर्यंत कातकरी वाडी ते प्रजापती कॉम्पलेक्स पर्यंत वैदयवाडी, गोदरेज सोसा. मिडलक्लास सोसा. (भाग -1) आमदार निवास रोड परिसर, प्लॉट नं. 11 ते प्लॉट नं. 1 पै मॅडम निवास पर्यंत, विश्राळी तलाव ते पंजाब हॉटेंल, पेट्रॉल पंप पर्यंत विश्राळी नाका ते पंजाब हॉटेल पर्यंत, विश्राळी तलाव झोपडपट्टी परिसर ,<br>मिडल क्लास सोसायटी भाग 2 - गांधी हॉस्पिटल, आय.सी.सी.आय बँक पर्यंत, गांधी हॉस्पिटल ते ॲक्सिस बँक पर्यंत, प्लॉट नं. 64 ते रायगड बँक पर्यंत, शेषगिरी बंगला ते अमेय हॉस्पिटल पर्यंत, प्लॉट नं. 36 ते रुपाली टॉकिज पर्यंत | सायं. 7.00 | मेन व्हॉल खुटकर व्हॉल, पन्नास नंबर व्हॉल |
| | | | | सायं. 8.00 ते रात्री 9.30 | मेन व्हॉल, कस्तुरी ABCD सोसा नं. 1 ,कस्तुरी सोसा. नं. 2, (AA BB,) कस्तुरी सोसा. नं. 2 (EFG), कस्तुरी नं. 1 सोसा. (कस्तुरी नविन लाईन 3 ABCD), नॅशनल गॅलेक्सी सोसा., नॅशनल रेसिडन्सी सोसा., हॉयलॅन्ड पार्क सोसा. मोराज छोटा गेट परिसर |
| | | | | रात्री. 11.00 ते पहाटे 12.30 | नॅशनल पॅरराडाईज सोसा., गंगाजमुना सोसा. सन गंगौत्री सोसा. MA टाईप सोसा, KL मोराज सोसा. , नॅशनल गार्डन सोसा. कॉस्मो पॉलिटेक्नीकल सोसा. |
| | | | | पहाटे 12.30 ते पहाटे 2.00 | नॅशनल पॅलेस D सोसा, नॅशनल पॅलेस ABC सोसा. कॉस्मो पॉलिटेक्निकल सोसा. CD wing तक्का MECB, कांडपिले रेसीडेन्सी सोसा. गोविंद हारमोनियम सोसा. पर्लहोम सोसा. |
| | | | | पहाटे 2.00 ते पहाटे 3.00 | टाकी भरणे |

पुढील मजकूर पान ७ वर

## निवडक

### तळोजातून एकजण बेपत्ता

**पनवेल :** सोसायटीच्या आवारात फिरण्यासाठी जातो असे सांगून घराबाहेर पडलेला एकजण अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रमेश धोंडगे (वय ५२, रा. सेक्टर २७ तळोजा फेज-२) असे बेपत्ता व्यक्तीचे नाव आहे. रंग गोरा, अंगाने सडपातळ, उंची पाच फूट चार इंच असून अंगात पांढऱ्या व गुलाबी रंगाच्या रेषा असलेला फुल बाह्यांचा शर्ट व राखाडी रंगाची फुल पॅन्ट तसेच पायात काळ्या रंगाची चप्पल आहे. त्यांना मराठी भाषा बोलता येते. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा पोहवा किशोर कर्डीले (मो. ९००४७४७५१२) यांच्याशी संपर्क साधावा.



### भांड्यांसह विविध वस्तूंची चोरी

**पनवेल :** शहरातील देवळे तलावाच्या बाजूला असलेल्या स्नेहसागर कॅटरिंगच्या कौलारू भटारखान्यातून अज्ञात चोरट्याने भांडीसह इतर साहित्य चोरून नेल्याची घटना घडली आहे. अनिल तेरडे (वय ६२) यांचे पनवेल मनपासमोरील देवाळे तलावाच्या बाजूला असलेल्या स्नेहसागर कॅटरिंगच्या कौलारू भटारखान्यात अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून विविध प्रकारची स्टीलची भांडी, टाकी, प्रेशर कुकर व इतर साहित्य असा मिळून जवळपास नऊ हजार २७० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नवी मुंबईतील ३५ चौकांचे काँक्रीटीकरण

## खड्डे व वाहतूक कोंडीतून वाहनचालकांची होणार सुटका

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरातील वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असणाऱ्या चौकांचे काँक्रीटीकरण पालिकेच्या माध्यमातून करण्यात येत आहेत. एकूण ३५ चौकांचे काँक्रीटीकरण करण्यात येत असून आतापर्यंत त्यातील २६ चौकांचे काँक्रीटीकरणाची कामे पूर्ण करण्यात आली आहे. सध्या सात चौकांची कामे सुरू आहेत. त्यामुळे चौकांमध्येच पडणाऱ्या खड्ड्यांमुळे व तेथील वाहतूककोंडीमुळे होणारी वाहनचालकांची फरफट निकालात निघणार आहे.



शहरात बेलापूर ते दिघा विभागात असलेल्या या संपूर्ण नवी क्षेत्रात असलेल्या विविध विभागांमध्ये मुख्य तसेच शहरांतर्गत असलेल्या रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहेत. वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या चौकांमध्ये पडणारे खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र कायम पाहयला मिळत होते. सुरुवातीला या चौकांमध्ये पेव्हरब्लॉकच्या मदतीने खड्डे भरण्याचा प्रयत्न पालिकेच्या माध्यमातून प्रत्येक पावसाळ्यात करण्यात येत होता, परंतु हे काम वारंवार करावे लागत असल्याने चौकांचे काँक्रीटीकरण करण्यात येत आहे. यामुळे वाहतूक कोंडीचा त्रासही कमी झाला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई शहरातील रस्ते काँक्रीटीकरण करण्याचे आश्वासन दिले असताना नवी मुंबई शहरात मागील काही वर्षापासून अनेक विभागातील चौक व रस्तेही काँक्रीटीकरण करण्यात येत आहेत. याबाबत नवी मुंबई महापालिकेचे शहर अभियंता संजय देसाई यांनी, चौकांच्या काँक्रीटीकरणाला मागील तीन वर्षांपासूनच सुरुवात करण्यात आली असून एकूण ३५ चौकांचे काँक्रीटीकरण करण्यात येत आहे. त्यातील उर्वरीत काही चौकांच्या काँक्रीटीकरणाची कामे करण्यात येत आहेत. यासाठी एकूण ७० कोटी खर्च करण्यात येत असून यावर्षीच्या कामासाठी २२ कोटी खर्च येणार आहे, असे सांगितले.

शहरातील वाहतूक सुरळीतपणे होण्यासाठी शहरातील चौकांचे काँक्रीटीकरण महत्त्वाचे असून शहरात मोठ्या प्रमाणात चौकांच्या काँक्रीटीकरणाची कामे करण्यात आली आहेत. उर्वरीत कामे अभियंता विभागाकडून करण्यात येत आहेत. पावसाळ्यातील चौकातील खड्डेमुक्ती व इतर वेळी वाहतूक सुरळीतपणे होण्यासाठी चौकांचे काँक्रीटीकरण महत्तवाचे आहे, अशी माहिती नवी मुंबईची महापालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली.

## पनवेल परिसरातून २६ हजारांचे अमली पदार्थ जप्त

### एकजण ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातून अमली पदार्थात बाळगून विक्री करताना एकास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून तीन ग्रॅम चिटा (ब्राउन शुगर) पावडरसह एकूण २६ हजार रुपये किमतीचा ऐवज जप्त केला आहे.

पनवेल शहर पोलिसांचे पथक पनवेलजवळील पळस्पे परिसरात गस्त घालत असताना महेश साहेब देशमुख (वय ३४) हा विटा (शुगर) हा अमली पदार्थ विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडून पोलिसांनी तीन ग्रॅम चिटा (ब्राउन शुगर) पावडरसह एक हजार रुपये किमतीचा छोटा इलेक्ट्रॉनिक काटा, प्रत्येकी एक हजार रुपये किमीतीचे दोन मोबाईल, तसेच २१,४०० रुपये रोख असे एकूण २६ हजार रुपये किमतीचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी आरोपीविरोधात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.





**पनवेल : दिघाटीच्या नवनिर्वाचित सरपंच रजनी ठाकूर व सदस्यांना भाजप तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, सावळे माजी सरपंच शिवाजी माळी, दिघाटी माजी सरपंच अविनाश म्हात्रे, तंटामुक्ती अध्यक्ष गजानन ठाकूर, सुहास कदम, ज्येष्ठ नेते कमलाकर माळी, अर्जुन ठाकूर, अरुण ठाकूर, सुनील पाटील, सुरेश पाटील आदींनी शुभेच्छा दिल्या. या वेळी केळवणे पं.स. अध्यक्ष हिरामण ठाकूर, सदस्य मालती पाटील उपस्थित होते.**

## आदिवासी विद्यार्थिनी वसतिगृहात अन्नधान्य वितरण

**रसायनी : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्या वतीने आणि ११ सदस्यांच्या व्यक्तिगत सहाय्याने युसुफ मेहेर अली सेंटरच्या वसतिगृहातील आदिवासी विद्यार्थिनींसाठी भोजनासाठी आवश्यक असणारे पुरेसे धान्य सुपूर्द करण्यात आले.



या वेळी अध्यक्ष अमित शहा, माजी अध्यक्ष आल्हाद पाटील, बाळकृष्ण होनावळे, मेघा कोरडे, अनुराधा होनावळे, प्रतिक्षा कुरंगळे आदी उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. व त्यांचा उत्साह वाढविला. वसतिगृहाच्या अधीक्षक उत्पला म्हात्रे, युसुफ मेहेर अली सेंटरचे संचालक बाळकृष्ण सावंत, अनिल विश्वकर्मा, संतोष ठाकूर हे पदाधिकारीही या वेळी उपस्थित होते व त्यांनी या भेटीचे नियोजन करून सेंटरच्या कामाचा परिचय करून दिला.







**पनवेल : आजिवली येथील राजिप शाळेत श्री संत ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळ, रंगछंद कलाकार यांच्यातर्फे भव्य रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी परिसरातील कलाकारांनी काढलेल्या रांगोळ्यांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिन उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि. २२) गणित विभाग व विज्ञान संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला.



या दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांचे कौशल्य तसेच व्यक्त होण्याची क्षमता, बौद्धिक क्षमता व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे हा होता. स्पर्धेमध्ये विविध विभागातील सुमारे ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी स्पर्धकांना प्रश्नमंजुषासाठी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रा. महेश्वरी झिरपे समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. रश्मी पाटील उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रतीक्षा पाटील प्रा. कावेरी घोगरे व प्रा. श्वेता श्रीवास्तव यांनी केले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहून सहकार्य केले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर उपाध्यक्ष अरुण शेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख तसेच संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## तुराडे येथे नेत्रतपासणी शिबिराला प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील राजिप शाळा तुराडे, लायन्स क्लब ऑफ पनवेल, एचओसीएल आणि तुराडे ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य नेत्रचिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते.



एकूण १०५ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. गरजूंना मोफत दरात चष्मे वाटप करण्यात आले. सर्व मान्यवरांचे आयोजकांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रिंसिपल ऑफिसर ग्लोबल ॲक्शन टीम संजीव सुर्यवंशी, पीपीएन एन्टरप्रायजेस डायरेक्टर सचिन पाटील, एक्झिक्युटीव्ह व्हॉइस प्रेसिडेंट लक्ष्मी ऑरगॅनिक प्रशांत पाटील, तुराडेचे उपसरपंच भाऊ ठाकूर, पांडुरंग ठाकूर, सदस्य विश्वनाथ गायकवाड, प्रतिभा कोणकर, हर्षल पाठारे, ग्रामसेविका अस्मिता मोकल, शिवाजी माळी, मिलिंद जोशी, ॲड. के. एस. पाटील, नंदकिशोर धोत्रे, एस. जी. चव्हाण या वेळी उपस्थित होते.

## प्रणिती काळे-खेरडे यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार



**पनवेल : वार्ताहर**

एम. बी. मोरे फाउंडेशनच्या आर्ट, कॉमर्स, सायन्स महिला कॉलेजच्या प्रिन्सिपल म्हणून पनवेल येथे कार्यरत असलेल्या प्रणिती प्रभाकर काळे-खेरडे यांना परिवर्तन सामाजिक संस्था पुणे व जगदिशब्द फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने पुणे येथे सन्मानित करण्यात आले.

प्रणिती प्रभाकर काळे-खेरडे यांनी मुंबई विद्यापीठातून अनेक विषयात एमए केले असून त्या नेट सेट परीक्षेतसुद्धा उत्तीर्ण झाल्या आहेत. त्याचप्रमाणे त्यांना साहित्यिक समाजसेविका व एक उत्तम वक्त्या आहेत. त्यांनी आतापर्यंत सामाजिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात केलेल्या कामाची दाखल घेऊन त्यांना परिवर्तन सामाजिक संस्था पुणे व जगदिशब्द फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

## जीवन प्रवास पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील लेखिका, मालवणी कवयित्री वर्षा भाबल यांच्या जीवन प्रवास या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले.

या वेळी प्रमुख पाहुणे लेखक व समीक्षक प्रा. अविनाश कोल्हे म्हणाले, स्वतःचे जीवनचरित्र लिहिणे सोपे नसते, पण लेखिकेने हे सारे अतिशय उत्कृष्ट शैलीत मांडले आहे. माजी कोकण विभागीय माहिती संचालक देवेंद्र भुजबळ म्हणाले, वर्षा भाबल यांचा जीवन प्रवास हे पुस्तक म्हणजे त्यांचे जीवनपट उलगडणारे कोडे आहे. प्रकाशिका अलका भुजबळ यांनी पुस्तक प्रकाशनामागील भूमिका स्पष्ट केली.

लेखिका वर्षा भाबल यांनी, आपला जीवन प्रवास कसा घडला, हे सांगितले. पुस्तक अतिशय देखणे झाले असून फार वाचनीय आहे, असे साहित्यिक शांतीलाल ननवरे यांनी सांगितले. राज्य गाबित समाजाचे अध्यक्ष सुजय धुरत यांनी वर्षा भाबल यांचे कौतुक केले. या वेळी डॉ. सुशांत भाबल, डॉ. जुई प्रल्हाद भाबल, डॉ. भक्ती टिकम, डॉ. अनिल पराडकर यांना गौरविण्यात आले.



## बीपीएमएस ऑनलाईन कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत बीपीएमएस ही ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीचा उपयोगाबाबत माहिती देण्यासाठी नवी मुंबई महापालिकेत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेमध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १२०हून अधिक वास्तुविशारद व विकासक सहभागी झाले होते. सहाय्यक संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांनी, वास्तुविशारद व विकासक हे वापरकर्ते आणि प्रणालीचे निर्माते महाआयटी यांचा परस्परांशी सुसंवाद घडवून या प्रणालीचा वापर व्हावा यादृष्टीने समन्वयाचे काम कार्यशाळेच्या माध्यमातून महापालिका करित असल्याचे सांगितले.

महाआयटीच्या वतीने गिरीश गोसावी, मिहिर शहा व रघुराव यांनी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले.वास्तुविशारद असोसिएशनचे अध्यक्ष कौशल जाडीया तसेच बिल्डर्स असोसिएशनचे पदाधिकारी बी.एम.सीराज यांनीही कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल समाधन व्यक्त केले.



**वाचाल तर वाचाल!**

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

### जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी ‘दैनिक राम प्रहर’च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण. येत्या रविवारी, २५ डिसेंबर २०२२ रोजी वाचूया पोलादपूर (रायगड) येथील कवी, व्याख्याता व निवृत्त शिक्षक जयंत देशपांडे (एम.ए.बी.एड्.) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# एक्स्प्रेस वेवर तीन गाड्यांचा अपघात

## सुदैवाने जीवितहानी नाही, प्रवाशी किरकोळ जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर खोपोली हद्दीत गुरुवारी (दि. २२) सकाळी सहा वाजण्याच्या तीन गाड्यांचा अपघात झाला. या अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नाही, प्रवाशांना किरकोळ जखमा झाल्या. मात्र गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. जखमींना पनवेल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मुंबईकडे जाणारा ट्रक (टीएन-३९,सीएम-९२२७) वरील चालक आर. अरुण (वय ३६, रा. कर्नाटक) याचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने ट्रकचे पुढे जाणाऱ्या आय-२० कार (एमएच-४८,पी-३६८९) ला मागून धडक दिली. त्यानंतर पुढच्या व्हॅगनार कार (एमएच-१२,बीके-४२८६) ला धडक मारून काही अंतर फरफटत नेले. यात कारमधील महिला जखमी झाली. तिला कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

अपघातात बाधित झालेल्या दोन्ही कारमधील प्रवाशांनी सीटबेल्ट लावल्याने मोठी हानी टळली असे प्रत्यक्षदर्शीने सांगितले.

या अपघाताची माहिती मिळताच आयआरबी पेट्रोलिंग टीम, देवदूत यंत्रणा, लोकमान्य ॲम्बुलन्स सेवा, बोरघाट वाहतूक पोलीस, डेल्टा फोर्सचे जवान मदतीसाठी धावले. त्यांनी बाधित वाहने लागलीच बाजूला काढल्यामुळे वाहतूकही खुली झाली. या अपघाताची नोंद खोपोली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.




# बोरघाटातून ट्रक दरीत कोसळला

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

बोरघाटातील खोपोली बायपासजवळ मीळ गावच्या हद्दीत चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने पुणे-मुंबई महामार्गावरून चाललेला ट्रक गुरुवारी (दि. २२) सकाळी खोल दरीमध्ये कोसळून पलटी झाला. या अपघातात ट्रक चालक झाला. त्याला कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.



चालक रफीक शेख त्याच्या ताब्यातील ट्रक (एमएच-२०,इ-६१६८) चालवित पुणे बाजूकडून मुंबईकडे जात होता. बोरघाटातील मील गावाच्या हद्दीत गुरुवारी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक मुंबई-पुणे महामार्गाच्या बाजूला १०० फुट खोल दरीमध्ये कोसळून पलटी झाला. या अपघातात ट्रक चालक रफीक शेख याच्या मानेला गंभीर इजा झाली. परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी ट्रकचालकाला प्रथम खोपोली नगर परिषदत रुग्णालयात दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे. या अपघाताची नोंद खोपोली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास सहाय्यक निरीक्षक योगेश भोसले करीत आहेत.

दूसरा अपघात खोपोली-पेण रस्त्यावरील आजीवली गावाजवळ झाला. खालापूर पंचायत समितीच्या अभियंता रसिका जाधव यांच्या गाडीला अज्ञात वाहनाने ठोकर दिली. या अपघातात अभियंता रसिका जाधव यांची गाडी तीनवेळा पलटी झाली. सुदैवाने कोणालाही इजा झाली नाही.

# घोडीवलीमार्गे केळवली-डोळवली रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील घोडीवली फाटा मार्गे नावंढे, केळवली, वणी, बीड, जांबरुंग, खरवई, डोळवली रस्ता खड्ड्याच्या विळख्यात सापडला आहे. या मार्गावरील काही मोऱ्यांना भगदाडे पडली आहेत, या रस्त्यावर रोज लहान-मोठे अपघात घडत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पंचक्रोशी संघर्ष कमिटीच्या माध्यमातून मंगळवारी (दि. २०) खालापूर तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी, आणि पोलीस ठाणे यांना निवेदन देण्यात आले.



खालापूर तालुक्यातील काही रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे, त्यामुळे वाहन चालकांसह पादचारी, प्रवाशांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. घोडीवली फाटा मार्गे नावंढे, केळवली, वणी, बीड, जांबरुंग, खरवई, डोळवली रस्त्याची दूरवस्था झाली आहे. त्याचा त्रास वाहन चालकांसह पादचारी व ग्रामस्थांनी होत आहे. पंचक्रोशीतील सर्व पक्षीय नेते व ग्रामस्थांनी एकत्र येवून पंचक्रोशी संघर्ष कमिटीच्या माध्यमातून मंगळवारी खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला आणि खालापूर पोलीस ठाण्याला निवेदन दिले. त्यात या रस्त्याचे काम त्वरित सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# अलिबाग एसटी आगाराजवळील अतिक्रमण हटवले

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या अलिबाग आगाराला लागून मुख्य रस्त्यावरील पदपथावर गजरे विकणाऱ्यांनी केलेले अतिक्रमण अलिबाग नगर परिषदेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने गुरुवारी (दि. २२ ) हटवले. अलिबाग नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे याच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली आहे.



अलिबाग शहरातील एसटी आगाराच्या बाहेरील पदपथावर गेली अनेक वर्ष गजरे विकणाऱ्यांनी अनधिकृतपणे ताबा मिळवला होता. गजरे विकणाऱ्या कुटुंबांनी आपल्या व्यवसाय सोबत तिथेच आपला संसार थाटला होता. गुरुवारी मुख्याधिकारी अंगाई साळुंखे याच्या आदेशाने अतिक्रमण विरोधी पथकाने या अतिक्रमाणावर पोलिसांच्या उपस्थितीत कारवाई केली. शहारातील इतर रस्त्यांवर फळ विक्रेते, दुकानदार यांनी आपली दुकाने थाटून अतिक्रमण केले आहे, ती अतिक्रमणेदेखील हटवावीत, अशी मागणी होत आहे.

# काशिद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिंदे गटाच्या वर्षा दिवेकर यांची बिनविरोध निवड



**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील काशिद ग्रामपंचायतीच्या नुकत्याच झालेल्या सभेत शिंदे गटाच्या वर्षा विलास दिवेकर यांची उपसरपंच पदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

मयुरी धार्वे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानै काशिद ग्रामपंचायतीचे उपसरपंच पद रिक्त झाले होते. सरपंच नम्रता कासार-खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच ग्रामपंचायतीची सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सभेमध्ये वर्षा विलास दिवेकर यांची उपसरपंच पदी सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यानंतर नवनिर्वाचित उपसरपंच वर्षा दिवेकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# पेणध्ये रविवारी हिंदू राष्ट्र जागृती सभा

**पेण : रामप्रहर वृत्त**

भारतात हिंदूवर निरनिराळे आघात होत आहेत. धर्मांतर, लव्ह जिहाद, हलाल जिहाद आदी षडयंत्रे प्रतिदिन उघड होत आहेत. अशा अनेक समस्यांना वाचा फोडण्यासाठी तसेच हिंदू राष्ट्र स्थापन व्हावे, या उद्देशाने हिंदू जनजागृती समितीच्या वतीने रविवारी (दि. २५) सायंकाळी ४.३० वाजता पेण कोळीवाडा येथील वाल्मिक निवास मैदानावर हिंदू राष्ट्र जागृती सभेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक सागर चोपदार यांनी पेण येथील रेडवूड सिटी प्लाझा येथे झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिली.

सागर चोपदार पुढे म्हणाले की, या देशातील हिंदूंना पुन्हा एकदा सन्मानाने जगण्यासाठी 'हिंदु राष्ट्र' स्थापण्याची आवश्यकता असून त्यासाठी सभांच्या माध्यमातून देशभर जनजागृती केली जात आहे. हिंदु जनजागृती समिती आणि विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे कार्यकर्ते विविध भागात बैठका, व्याख्याने, हस्तपत्रके, भित्तीपत्रके, फ्लेक्स फलक यांच्यासह सोशल मीडियाच्या व्हॉट्सॲप, ट्विटर, फेसबुक या माध्यमांतून या सभेचा प्रसार मोठ्या प्रमाणावर करीत असून, त्याला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद याला लाभत आहे.

अधिक माहितीसाठी ८३६९१३२१४२ या क्रमांकावर संपर्क करावा तसेच धर्मप्रेमी हिंदूंनी या सभेला उपस्थित रहावे, ही असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

सकल हिंदू समाजाचे मोहन पारटे, दीपाली क्लॉथ स्टोअरचे महेश पाटील, हलाल सक्ती विरोधी समितीचे माणिक पवार, अमर सिंह परमार, स्वराज्य प्रतिष्ठान संघटनेचे अध्यक्ष मंगेश दळवी आणि सह्याद्री प्रतिष्ठानचे प्रदेश उपाध्यक्ष समीर म्हात्रे या वेळी उपस्थित होते.

# निजामपूर विद्यालयात गणित दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील निजामपूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात गुरुवार (दि. २२) सकाळी दैनंदिन परिपाठाअंतर्गत राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. नवोदय प्रार्थनेनंतर महान गणित तज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. या वेळी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध गणित प्रकारांचे सादरीकरण केले. यात विश्वजित नाचपल्ले, श्रीप्रिया घाडगे, संयोगिता गायकवाड, स्वरांजली गर्जे, सुहाना चौहान, तानवी सेन यांचा सहभाग होता. यानंतर प्राचार्य के. वाय. इंगळे आणि गणेश अडोडे यांनी दैनंदिन जीवनात गणिताचे महत्त्व या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला सुनिता जैसवार, विष्णू दत्त, केदार केंद्रेकर, नम्रता काकडे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. जवाहर नवोदय विद्यालयाच्या गणित आणि सांस्कृतिक विभागाच्या शिक्षकांचे हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य लाभले.



**पान ५ वरून**

| अ. क्र. | वार | उंच जलकुंभाचे ठिकाण | पाणीपुरवठा बंद राहणाऱ्या भागाचे नाव | पाणीपुरवठा सुरु राहणाऱ्या भागाचे नाव व वेळ | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वेळ | पाणी सुरु राहणारा भाग |
| | | | | पहाटे 3.00 ते पहाटे 5.00 | मोराज मोठा गेट परिसर, (मोराज MA 1,2,3,4, T, T2 T3T4,S, S2, S3, S4, S5, S6, मोराज तापी नर्मदा , मोराज R, R2, R3, R4, K3, K4, MA, KL, |
| 9 | शुक्रवार | सर्व्हिस हौद नविन उंच जलकुंभ /गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ | मेन व्हॉल खुटकर व्हॉल, पन्नास नंबर व्हॉल मेन व्हॉल, कस्तुरी ABCD सोसा नं. 1 ,कस्तुरी सोसा. नं. 2, (AA BB,) कस्तुरी सोसा. नं. 2 (EFG), कस्तुरी नं. 1 सोसा. (कस्तुरी नविन लाईन 3 ABCD), नॅशनल गॅलेक्सी सोसा., नॅशनल रेसिडन्सी सोसा., हॉयलॅन्ड पार्क सोसा. मोराज छोटा गेट परिसर, नॅशनल पॅरराडाईज सोसा., गंगाजमुना सोसा. सन गंगौत्री सोसा. MA टाईप सोसा, KL मोराज सोसा. , नॅशनल गार्डन सोसा. कॉस्मो पॉलिटेक्नीकल सोसा. इत्यादी | सकाळी 6.00 ते सकाळी 7.15 | पगडे आळी परिसर पर्यंत, तक्का गाव पुर्ण एकविरा मंदिर परिसर पर्यंत, भगत आळी पर्यंत सावता माळी हॉल परिसर |
| | | | CD wing तक्का MSEB, कांडपिले रेसीडेन्सी सोसा. गोविंद हारमोनियम सोसा. पर्लहोम सोसा मोराज मोठा गेट परिसर , (मोराज MA 1,2,3,4, T, T2 T3T4,S, S2, S3, S4, S5, S6, मोराज तापी नर्मदा , मोराज R, R2, R3, R4, K3, K4, MA, KL,इत्यादी | सकाळी 8.30 ते सकाळी 10.00 | मेन व्हॉल, आझाद नगर सोसा. परिसर, एन.के.हेरिटेज सोसा. साईबाबा मंदिर परिसर, रिध्दी सिध्दी गार्डन सोसा, न्यु इडन गार्डन सोसा. रिध्दी हाऊन व सिध्दी हाऊस सोसा. कातकरी वाडी ते प्रज्ञापती कॉम्पलेक्स पर्यंत वैदयवाडी , गोदरेज सोसा. |
| | | | | दुपारी 1.00 ते दुपारी 2.15 | मिडलक्लास सोसा.- भाग -1 आमदार सोसा. निवास रोड परिसर, प्लॉट नं. 11 ते प्लॉट नं. 1 पै मॅडम निवास पर्यंत, विश्राळी तलाव ते पंजाब हॉटेल, पेट्रोल पंप पर्यंत विश्राळी नाका ते पंजाब हॉटेल पर्यंत, विश्राळी तलाव झोपडपट्टी परिसर |
| | | | | दुपारी 4 ते सायं 5.15 पर्यंत | मिडल क्लास सोसायटी भाग – 2 गांधी हॉस्पिटल ते आय.सी.सी.आय बँक पर्यंत, गांधी हॉस्पिटल ते ॲक्सिस बँक पर्यंत , प्लॉट नं. 64 ते रायगड बँक पर्यंत, शेषगीरी बंगला ते अमेय हॉस्पिटल पर्यंत, प्लॉट नं. 36 ते रुपाली टॉकिज पर्यंत. |
| 10 | शनिवार | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरु | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरु |
| 11 | रविवार | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरु | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरु |

टिप :- उपरोक्त वेळापत्रका मध्ये उपलब्ध पाणीपुरवठयानुसार पाणी वितरणाच्या वेळेमध्ये वेळोवेळी बदल करण्यात येईल.

**सही/-**
**अभियंता पायाभूत सोई सुविधा**
**पनवेल महानगरपालिका**

**सही/-**
**उप अभियंता, (पापु.)**
**पनवेल महानगरपालिका**

# बांगलादेशचा पहिला डाव गडगडला

## उमेश यादव आणि आर. अश्विनचा भेदक मारा



**ढाका : वृत्तसंस्था**

भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसर्‍या कसोटी सामन्याच्या गुरुवारी (दि. २२) पहिल्याच दिवशी यजमानांचा डाव २२७ डावांवर संपुष्टात आला. भारताकडून उमेश यादव आणि आर. अश्विनने सर्वाधिक प्रत्येकी चार गडी बाद केले.

नाणेफेक जिंकून बांगलादेशने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. बांगलादेशकडून मोमिनुल हकने सर्वाधिक ८४ धावा केल्या. मुशफिकर रहीम २६, लिटन दास २५ आणि शांतोने २४ धावांचे योगदान दिले. याव्यतिरिक्त इतर फलंदाजांना काही खास कामगिरी करताना आली नाही.

भारताकडून गोलंदाजीत उमेश यादव याने १५ षटकांमध्ये २५ धावा देताना चार विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर अश्विननेदेखील ७१ धावा देताना चार विकेट्स घेतल्या. याशिवाय १२ वर्षांनंतर कसोटी संघात पुनरागमन करणाऱ्या जयदेव उनाडकटने दोन विकेट्स घेतल्या. यानंतर भारताने पहिल्या डावाला सुरुवात केली आहे. पहिल्या दिवसाचा खेळ संपला तोपर्यंत भारतीय संघाने आठ षटकांत बिनबाद १९ धावा केल्या आहेत. केएल राहुल तीन आणि शुबमन गिल १४ धावांवर नाबाद आहेत.

### उनाडकटचा अनोखा विक्रम

बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताच्या जयदेव उनाडकटला संधी मिळाली. या सामन्यात खेळायला उतरताच त्याच्या नावावर अनोखा विक्रम नोंदवला गेला. एका कसोटीपासून दुसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान सर्वांत जास्त सामन्यांना मुकणारा तो दुसरा खेळाडू ठरला आहे. त्याने शेवटचा कसोटी सामना २०१०मध्ये खेळला होता. पुनरागमन करीत त्याने पहिली विकेट घेतली. त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ही पहिलीच विकेट ठरली आहे.



# जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेतर्फे जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेचे आयोजन खारघर सिडको गार्डन सेक्टर १९ येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उज्ज्वल यश संपादन केले.

या स्पर्धेत दुर्वा केंद्रे, न्यासा ब्रम्हा यांनी प्रथम क्रमांक, तारक बॅनर्जी, लावण्या पांडे यांनी द्वितीय, तर स्वरूप गावडे याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक मंदार मुंबईकर व स्वप्नील मोरे यांचे, संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

# वकिलांच्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी अलिबागचा संघ सज्ज




**अलिबाग : प्रतिनिधी**


संभाजीनगर येथे २३ डिसेंबरपासून महाराष्ट्र आणि गोवा वकिलांच्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. संभाजीनगर वकील संघटनेतर्फ आयोजित या स्पर्धेत महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील एकूण ९४ संघ सहभागी होणार आहेत.

३२ गटांमध्ये संघांची विभागणी करून प्रथम साखळी व नंतर बाद फेरीचे सामने होणार असून स्पर्धा लेदर बॉल टी-२० फॉरमॅटनुसार खेळली जाणार आहे. या स्पर्धेसाठी अलिबाग सी-हॉक्स संघ ॲड. महेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली संभाजीनगर येथे शुक्रवारी (दि. २३) रवाना होणार आहे.

अलिबागच्या संघात महेश म्हात्रे (कर्णधार), राहुल मोरे, प्रशांत म्हात्रे, स्नेहेंद्र पवार, कौस्तुभ पुनकर, ऋग्वेद ठाकूर, समीर बंगाली, प्रशांत गावंड, पंकज पंडित, मनीष पाटील, ह्रषिकेश माळी, रोहित भोईर, राहुल खरात, विशाल जाधव यांचा समावेश आहे. या संघाला अलिबाग वकील संघटनेतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

# नोटांवर झळकणार मेस्सीचा फोटो?

**ब्यूनस आयर्स : वृत्तसंस्था**



अर्जेंटिनाच्या संघाने फिफा विश्वचषक पटकाविला. विश्वचषकाची ट्रॉफी जिंकून मायदेशात गेलेल्या लिओनेल मेस्सी आणि त्याच्या संघाचे दणक्यात स्वागत करण्यात आले. ब्युनोस आयर्सच्या रस्त्यावर लाखो लोक मेस्सी ॲण्ड कंपनीच्या स्वागतासाठी जमले होते. आता येत असलेल्या बातम्यांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. अर्जेंटिना सरकार तेथील नोटांवर मेस्सीचा फोटो लावण्याच्या मनःस्थितीत असल्याचे सांगितले जात आहे.

अर्जेंटिना सरकारने आपली कल्पना अंमलात आणून तेथील नोटांवर मेस्सीचा फोटो लावला तर विश्वचषक जिंकल्यानंतर एखाद्या खेळाडूच्या फोटोला देशाच्या चलनावर स्थान मिळण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असेल. अर्जेंटिनाच्या सरकारी विभागातही याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत.

# पेण संघाने जिंकली डॉक्टर्स फ्रेंडशीप ट्रॉफी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित डॉक्टरांच्या क्रिकेट स्पर्धेची फ्रेंडशीप ट्रॉफी पेण यंगीस्थान संघाने पटकाविली. उलवे युनायटेड संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, डॉ. गणेश ठाकूर, डॉ. शैलेश पालेकर, डॉ. ययाती गांधी, डॉ. संतोष जाधव, डॉ. कुणाल मक्खीजा यांच्या हस्ते झाले. डॉ. प्रमोद गांधी, डॉ. जगे, डॉ. संतोष आगलावे, डॉ. नितीन पोवळे, डॉ. विशाल वाणी, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. अमृतकर, डॉ. घनश्याम पाटील, डॉ. विनय पाटील, डॉ. सचिन पवार, डॉ. अमित मळेकर उपस्थित होते.

स्पर्धेचे आयोजन डॉ. शिरीष जोशी, डॉ. अभिजित भोईर, डॉ. संकेत पवळ, डॉ. आरुणेश शिंदे, डॉ. कणकण करावकर, डॉ. गणेश कुंभार, डॉ. वैभव बैलकर, डॉ. इंदर चव्हाण, डॉ. अनिकेत भोईर, डॉ. ननावरे, डॉ. स्वप्नील अवसरमल, डॉ. योगेश चिकणे यांनी केले होते.

स्पर्धेत एकूण आठ संघांचा सहभाग होता. करंजाडे, खांदा कॉलनी, खारघर, तळोजा, पनवेल, कामोठे तसेच एचएचएफ नवी मुंबई आणि करंजाडे या महिला संघांचा समावेश होता.

बक्षीस वितरण डॉ. विकास डोळे, टकाटक सिनेमा फेम अभिनेता संकेत कोर्लेकर, डॉ. विकास गांडाळ यांच्या हस्ते झाले.

# ...म्हणून टीम इंडियाच्या कर्णधारपदासाठी धोनीच्या नावाची शिफारस केली होती

## सचिन तेंडुलकरचा मोठा खुलासा

**मुंबई : प्रतिनिधी**



महेंद्रसिंह धोनीची गणना केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वांत यशस्वी कर्णधारांमध्ये केली जाते. त्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने जे काही साध्य करण्याचे स्वप्न होते ते सर्व साध्य केले. धोनीला कर्णधार बनवण्यात सर्वात मोठा हात होता ज्याला क्रिकेटचा देव म्हटले जाते त्या सचिन तेंडुलकरचा. सचिनच्या शिफारशीमुळे धोनीला ज्युनियर असूनही संघाचे कर्णधारपद मिळाले.

धोनीने पहिल्यांदा २००७ च्या टी-२० विश्वचषकात संघाचे नेतृत्व केले होते. जिथे भारताला विजेतेपद मिळवण्यात यश आले होते. यानंतर धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने २०११ विश्वचषक तसेच २०१३ची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. ही तीन आयसीसी विजेतेपदे मिळवणारा धोनी जगातील एकमेव कर्णधार आहे.

'इन्फोसिस'च्या एका कार्यक्रमात सचिन तेंडुलकरने धोनीला कर्णधार बनवल्याचा किस्सा सांगितला आहे. सचिन म्हणाला, मला जेव्हा कर्णधारपदाची ऑफर देण्यात आली तेव्हा ते इंग्लंडमध्ये होते. मी म्हणालो की आमच्याकडे संघात खूप चांगला लीडर आहे, जो अजूनही ज्युनियर आहे. तो असा आहे की ज्याच्यावर तुम्ही बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. मी त्याच्याशी खूप गप्पा मारल्या आहेत. विशेषत: ज्या मैदानावर मी पहिल्या स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करायचो आणि तेव्हा त्याला विचारले की तुला काय वाटते?

सचिन पुढे म्हणाला, राहुल कर्णधार असला तरी मी त्याला विचारले आणि मला मिळालेला प्रतिसाद अतिशय संतुलित, शांत, तरीही खूप परिपक्व होता. स्मार्ट कर्णधार म्हणजे विरोधी पक्षाच्या एक पाऊल पुढे राहणे. आपण म्हणतो त्याप्रमाणे जर कोणी हुशार असेल तर त्याने सतर्कतेने खेळावे, उत्कटतेने नाही. हे लगेच होत नाही. तुम्हाला १० चेंडूंत १० विकेट मिळणार नाहीत. त्यासाठी नियोजन करावे लागेल. दिवसाच्या शेवटी स्कोअरबोर्ड महत्त्वाचा असतो आणि ते गुण मला त्याच्यात दिसले. म्हणूनच मी त्याच्या नावाची शिफारस केली.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधिताशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com